
# श्री साईलीला



धुनीसमोर श्रीबाबा



ऑगष्ट ] कि. १ रु. [ १

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

जय जयाजी दीन दयाळा ।
भक्तोद्धारा परम प्रेमळा ।
व्यापूनि अखिल ब्रह्मांडमाळा ।
वससी निराळा शिर्डीत ॥ ६ ॥

जातें मांडूनि पाय पसरितां ।
संत असतां दळण दळितां ।
खुंटा ठोकूनि वैरा रिचवितां ।
विस्मय चित्ता माझिया ॥ ७ ॥

तेंच कीं या ग्रंथा मूळ ।
मनीं इच्छा उद्भवली प्रबळ ।
कीं हीं ऐसीं कर्मे सकळ ।
वर्णितां कश्मल हरेल ॥ ८ ॥

हरि स्वयें होईल प्रसन्न ।
तया आवडे तयाहून ।
कोणीं केलिया निजभक्त कीर्तन ।
अथवा गुणवर्णन भक्तांचे ॥ ९ ॥

आशंकतील श्रोते सज्जन ।
जयां निराधार वाटेल हें विधान ।
तिहीं पहावें भविष्योत्तर पुराण ।
त्रिपुरारी कथन करी हें ॥ १० ॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४० वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५९ वे] ऑगस्ट १९८० [अं. ५

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. १०–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक १ रु. फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका–ऑगस्ट १९८०


१) संपादकीय — श्रीबाबांचा खरा भक्त कोण ?
२) श्रीकृष्णसरस्वती दत्तमहाराज —
३) शिरडीतील गुरुपौर्णिमा — श्री. चकोर आजगांवकर
४) प्रिय विलास भक्ती — डॉ. के. भ. गव्हाणकर
५) पूज्य श्री. मोटा महाराज — ले. क. मु. ब. निंबाळकर
६) नामाचा महिमा — डॉ. रा. सी. कापडी
७) नवसास पावणारा दर्या हनुमान — श्री. गं. गो. सामंत
८) परात्पर गुरु — कु. सुलोचना गुरु गोदावरी
९) माझी कनवाळू साईमाऊली — श्री. के. वि. एस.
१०) असे घडले शिरडी दर्शन — डॉ. मालती राहाटे
११) दिव्य प्रचिती — सौ. उषा अधिकारी
१२) शिरडीस येणाऱ्या भक्तांसाठी सूचना —
१३) श्रीसाईबाबांची कृपा — श्री. एन. बी. गुरपवार
१४) ज्याच्या मुखी साई साई — कु. वासंती कर्णिक
१५) रखवाले साईनाथ — श्री. स. व्यं. कुलकर्णी
१६) जेथे जातो तेथे... — सौ. सुलभा कुलकर्णी
१७) आले घरा साईनाथ, ती उदी — श्री स. मा. मुन्हार
१८) शिरडीवृत्त — ऑगस्ट १९८०
१९) श्रीसाई परिवार वृत्त विशेष —
२०) ऐसी माझी माऊली रे — सौ. तारा चेंदवणकर
२१) श्रीसाई गीत तुषार — श्री. सुहास देसाई
२२) लेणे, छाया — डॉ. इंदू नाईक
२३) अंतरीचा आनंद, आभार — रश्मी कोरे
२४) असे बाबा साईनाथ — श्री. एकनाथ मेस्त्री
२५) साई माझा गुरु — श्री. अनंत कदम
२६) जन हो बोला साई साई — सौ. शशिकला रेवणकर
२७) साईला आवडते तुळसीचे पान — सुश्री. लीला गुजराथी


☆ ☆ ☆

संपादकीय —

स. न. वि. वि.

# श्रीसाईबाबांचा खरा भक्त कोण ?

एका गुरुजींनी आपल्या शिष्यांची परिक्षा घेण्याच्या दृष्टीने त्यांना विचारले की, तीन ऋतूत श्रेष्ठ ऋतू कोणता ? कोणी म्हणाले हिंवाळा श्रेष्ठ; कारण त्या ऋतूत एकंदर वातावरण उत्साह वर्धक असते. दुसरे काही म्हणाले, उन्हाळा श्रेष्ठ; कारण त्या ऋतूत मोकळेपणी हिंडता फिरता येते; आणि त्या सर्व शिष्यांत एक लहानगा शिष्य होता. तो म्हणाला. 'नाही महाराज ! पावसाळाच सर्व ऋतूत श्रेष्ठ आहे असे मला वाटते.'

ते उत्तर ऐकून सारे शिष्य मोठमोठ्याने हसू लागले. गुरुजी गंभीर चेहऱ्याने त्या सर्वांकडे पहात होते. ते त्या लहानग्या शिष्याकडे वळून म्हणाले, 'वत्सा ! पावसाळा का श्रेष्ठ वाटतो तुला ?'

'गुरुदेव,' तो शिष्य नम्रतापूर्वक म्हणाला, 'वर्षाऋतु मला सर्वांत श्रेष्ठ वाटतो याचे कारण, तो साऱ्या लोकांना धनधान्य देणारा आहे. समृद्धीदाता आहे. पोटापाण्याचा प्रश्न सोडवून साऱ्या जगाला जगविणारा आहे. नाक नाही तर चेहऱ्याचे काय महत्त्व ! तसेच पावसाळा नसला तर इतर ऋतु काय कामाचे ? आणि त्यामुळे मला त्याच ऋतुचे महत्त्व वाटते.'

गुरुजींनी त्या शिष्यास शाबासकी दिली. नंतर इतर शिष्यांकडे वळून म्हणाले, 'तुम्ही त्याचे उत्तर ऐकून हसलात, परंतु त्याचेच उत्तर बिनतोड व अर्थबोधक आहे. तुमची मनोवृत्ति संकुचित आहे. तुम्हाला व्यापक दृष्टी नाही. तुमचे विचार स्वार्थी स्वरूपाचे आहेत. तुम्ही केवळ तुमच्या सुखापुरता विचार केला; त्या छोट्या शिष्याने विशाल दृष्टीने प्रश्नाकडे पाहिले. आत्मोन्नति साधावयाची असल्यास स्वार्थ व संकुचित भावनांचा त्याग केला पाहिजे. उदार व विशाल अंतःकरण बाळगल्याने आत्मोन्नति साधता येते.

श्री साईबाबांनी आम्हाला जगाकडे पहाण्याची व जगाशी वागण्याची उदार दृष्टी दिली. त्यांच्या ठायी कोणत्याही बाबतीत संकुचित भावनेला वाव नव्हता. त्यांचे अंतःकरण सर्व बाबतीत विशाल व सर्वासाठी प्रेमाने भरलेले होते. त्याप्रमाणे आम्ही वागलो तरच जन्मा आलीयाचे सार्थक ! त्यांच्या जीवनसूत्राचा आपण बारकाईने विचार केला पाहिजे. ती आचरणात आणण्यासाठी अहर्निश झटले पाहिजे. साईबाबांचा खरा भक्त शिष्य कोण ? जो सर्वांकडे समदृष्टीने पाहतो; कोणत्याही

प्रकारचा भेदभाव ठेवीत नाही. सर्वांसाठी झटतो. सर्वांवर प्रेम करतो. दुसऱ्यांच्या अडीअडचणी जाणतो तोच. जेथे प्रेमभाव, खरेखुरे प्रेम आहे तेथे देवाचे वास्तव्य आहे म्हणून समजावे.

तुम्ही सुशिक्षीत वा अशिक्षीत असा. अंतःकरणात निःस्वार्थ प्रेम बाळगा. त्या प्रेमाचा सर्वांवर वर्षाव करा. याच मार्गाने तुम्ही उन्नति साधाल.

हेच पहा ना. अंतकरणात निःस्वार्थ व खरेखुरे प्रेम असेल तर तुम्हाला कोणाची निंदा करण्याची बुद्धी होणार नाही. तुम्ही कोणाचेहि वाईट चिंतिणार नाही. तुम्ही कोणाचे दोष शोधीत बसणार नाही. अंतःकरणात वहाणाऱ्या प्रेमभावाच्य झऱ्यामुळे या गुणांचा लाभ तुम्हाला आपोआप होईल, आणि हेच गुण उन्नत्तीला पोषक होऊन रहाणारे आहेत.

तुमचे आपल्या मुलांवर प्रेम असते. अगदी खरेखुरे प्रेम असते. त्यामुळे त्याच्या गुणांचेच दर्शन तुम्हाला घडेल. पत्नीचे पतीवर प्रेम असते. त्यामुळे तिला पतीचे गुणच दिसणार; तसेच हे आहे.

एकदा बालपणीची एक मैत्रिण मला भेटण्यासाठी आली. तिने उच्च शिक्षण घेतले होते. ती सामाजिक व विशेषतः स्त्रीजीवनविषयक कार्यात उत्साहपूर्वक भाग घेत असे. आमचे बोलणे चालू असता मी सहज तिला म्हटलं, 'काय ग! मी तुझ्यासारखे शिक्षण संपादन केले असते तर मलाहि भगिनी वर्गाची सेवा करण्याची सुसंधी लाभली असती; पण काय करणार!'

हे ऐकून माझी मैत्रीण खदखदा हसू लागली; म्हणाली, ज्याला सेवा करायची आहे, दुसऱ्यासाठी झटायचं आहे, त्याला शिक्षणाची काय बर जरूरी! शिक्षण संपन्न झाले म्हणजे सेवा करण्याची योग्यता प्राप्त होते असं थोडच आहे! जिच्या अंतःकरणात सेवा भावाचा उदय झाला तिला सेवेचे कार्य पदोपदी आढळून येईल. घरी, दारी, जिकडे जाल तिकडे सेवाच सेवा पडलेली आहे. ती करण्याची तुमची तयारी पाहिजे फार कशाला! आपल्या कुटुंबात मिळून मिसळून वागणे, कुटुंबातील लहान थोरांच्या उपयोगी पडणे, शेजाऱ्यांकडे लक्ष पुरविणे ही सेवा नव्हे काय!'

ते विचार ऐकून माझ्या मनात खरोखर विचारक्रांति घडून आली! माझी दुर्बलताच दूर पळाली. सेवेचे केवढे तरी क्षेत्र मला माझ्या घरीदारी व सभोवार दिसू लागले.

या जगात ज्याला खरोखर जगायचे आहे, तेजस्वी जीवन जगायचे आहे, त्याने सेवाभावाची, परोपकार करण्याची, दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. असे करील तोच जीवन जगला, त्यानेच जन्मास आलियाचे सार्थक केले असे म्हणता येईल.

श्रीसाईबाबांच्या शिकवणूकीचे हेच सार सर्वस्व आहे. त्यांच्या शिकवणूकीचे हेच मुख्य सूत्र आहे.

जीवनात आनंद व उत्साह ओतप्रोत भरून राहिला पाहिजे. प्रत्येक कार्य करताना आनंद व उत्साह वाटला पाहिजे. त्याशिवाय हाती घेतलेले कार्य उत्तम प्रकारे पार पडणार नाही.

तुमची जात, गोत, धर्म, कर्म कोणतेही असो. तुमचे अंतःकरण सर्वासाठी शुद्ध प्रेमाने नेहमी ओथंबलेले असू द्या. श्रीसाईबाबांच्या तेजस्वी जीवनाचे, त्यांच्या सर्वाभूती शुद्ध प्रेमाचे व त्यांच्या सेवाभावाचे स्मरण करा व तोच कित्ता सदैव दृष्टी समोर ठेऊन वागा, तुमचे कल्याण झाल्याशिवाय रहाणार नाही.

॥ ॐ साईराम ॥


# स्वामी कला केन्द्र

[ इंटर नॅशनल आर्टिस्ट ]

आप्पा सामंत सादर करीत आहेत

आर्केस्ट्रा व इतर मनोरंजनाचे कार्यक्रम

आणि


मंगलकार्यात मंगलवाद्य

## शहनाई ( सनई )

(शास्त्रोक्त, नाट्य संगीत, सिने संगीत)

पत्ता — आप्पा सामंत,
खांडके बिल्डिंग ११/२० एन. सी. केळकर रोड,
दादर–मुंबई नं. २८

# श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज



जन्म

माघ वद्य पंचमी
शके १७५७ रविवार
७-२-१८३६

समाधी

श्रावण वद्य दशमी
शके १८२२ सोमवार
२०-८-१९००

☆ ☆ ☆

सुखकर्ता दुःख हर्ता निर्मळ एकांतां ।
कलिमल दहना स्वामी समर्था ॥
नकळे ब्रम्हादिका अंत अनंता ।
तो तू आम्हां सुलभ जय कृपावंता ॥

ऐंशीव्या पुण्यतिथी निमित्य कोटी कोटी प्रणाम—

# श्रीकृष्ण सरस्वति दत्तमहाराज

श्रीक्षेत्र करवीर प्रांती शिरोळ पेठ्यात नांदणी नामक खेडेगावी प्रख्यात जोशी कुलामध्ये श्रीस्वामींचा अवतार माघ वद्य पंचमी शके १७५७ म्हणजेच रविवार ता. ७ फेब्रुवारी १८३६ रोजी झाला. श्रींचे आई वडील हे देशस्थ ऋग्वेदी शाखेचे ब्राह्मण, त्यांच्या आईचे नाव सौ. अन्नपूर्णाबाई व वडीलांचे नाव वेदमूर्ती आप्पाभट उभयता पती पत्नी अत्यंत सात्विक, भाविक, सद्धर्मी व परमईश्वर भक्त होती. मग अशा 'शुद्ध बीजा' पोटी, फळे रसाळ गोमटी निर्माण झाल्यास नवल ते काय? सती अन्नपूर्णाबाई गरोदर असताना त्यांचे डोहाळे फारच सूचक होते.

होता सारी गरोदरी । डोहाळे अती नोहरी ।
दिसे परम सुंदर । ब्रह्माकार जाहली ।
आवडे एकांत सदन । करू वाटे स्वचिंतन ।
परिसावे हरिगुण भजन करावे ।

श्रींचे नामाभिधान श्रीकृष्ण असे ठेवण्यात आले. बालपणापासूनच श्री ना एकांत प्रिय होता. श्री चे शिक्षण त्याकालास अनुसरून म्हणजे फक्त लिहिण्यावाचण्यापुरते झाले होते. कुणाशीही न बोलता श्री नेहमी प्रभु भजनात व नामस्मरणात दंग असत. फक्त उचित भाषण तेवढे करीत. बैसले तेथेची बसती । लागली स्वचिंतनी वृत्ती । अशाप्रकारे श्री नेहमी वावरत असत. आपल्या घरी किंवा घराशी आलेल्या अतिथींना मातेने काही अन्न भिक्षा दिली नाही तर श्री ना अतिशय वाईट वाटे व ते खिन्न वदन होत. कित्येकदा स्वतःस दिलेले अन्न सुद्धा ते त्यांना वाढत, देऊन टाकीत. इतकेच नव्हे तर अंगावरील वस्त्रे सुद्धा दुसऱ्यास देऊन आपण थंडीत कुडकुडत बसत. श्री व भूतदया त्यांच्यात एकरूप होती. या वागण्यामुळे श्री म्हणजे कुणी वेडा प्रमिष्ट आहे अशी लोकांची दृढ समजूत झाली होती. यामुळे घरच्या मंडळींनाही त्यांचा त्रासच वाटे व लोकनिंदा ऐकून ते फार उदासीन व दुःखी कष्टी होत. गावातील काही दुष्ट लोक त्यांना 'वेड्या कृष्णा' म्हणून हाक मारीत. श्रीस्वामी नेहमी वे प्रसन्न व हसत मुख असत. श्री वेड्यासारखे पुष्कळ भ्रमण करीत. दुर्जनाकडून त्यांना खूप उपद्रव होऊ लागला म्हणजे ते आपले कुलदैवत मंगसोळी येथील खंडोबाच जाऊन काही दिवस तिथेच रहात व प्रभुपदी लीन होत. अक्कलकोटचे श्रीनरसिंह भान महाराज यानी त्यांना गुरुस्थानी मानले होते.

श्रींनी जितकी बालवृत्ती बाहेर धारण केली होती तितक्याच पूर्ण तदाकारतेने श्रीस्वामी सच्चिदानंद स्वरुप होते. श्रींना भगवद गीता अत्यंत प्रिय होती. श्री अंगाने व कांतीने भव्य ठेंगणे सदा हसतमुख होते. मर्जीस आले तर ते खात व तेपण दुसऱ्याने भरवावे तेव्हा नाहीतर नाही. जेव्हा एकादा भक्त संकटात पडे तेव्हा श्रींच्या चर्येत एकदम विलक्षण फरक पडे व त्यावेळी त्यांचे चर्येवर जे तेज विलसे त्याचे वर्णन करणे अशक्य. इतरवेळी त्यांची मुद्रा नेहमी शांत व प्रसन्न असे, श्रींचे वास्तव्य करवीर नगरीत कुंभार गल्लीत परमभक्ती परायण ताराबाई शिर्के यांचे घरी २५-३० वर्षे होते. तिथेच श्रींनी शके १८२२ श्रावण दशमी सोमवार ता. २ ऑगस्ट १९०० पहाटे ४ वा. समाधी घेतली. श्रींचे असंख्य भक्त भारतभर आहेत श्रींचे चमत्कार भक्त जनाना माहित आहेत. श्री आपल्या भक्ताना अत्यंत प्रेमळ व भक्ति रसाचा सागर होते.

☆ ☆ ☆

**सवलतीत विक्रीस तयार !** **खास श्रावणमासासाठी !**

र. श्री. पुजारी लिखित

**१. श्रीसाईमहात्म्य ( पोथी )**

( तीन तासांच्या पारायणास उपयुक्त )

पृष्ठे १६८ किं. ७ रुपये

**२. श्रीसाईनाथ ( गद्य चरित्र )**

( श्रीसाईसच्चरिताच्या आधारे लिहिलेले )

पृष्ठे ३७५ मू. किं. १८ रुपये

सवलतीची किं. रु. १३=५० फक्त.

दोन्ही ग्रंथ मिळून किं. रु. २०

शिरडी व मुंबई येथेही पोथीची विक्री

लिहा: जयश्री प्रकाशन, ९९२ सदाशिव, पुणे-३०

# शिरडीतील गुरुपौर्णिमा

—श्री. चकोर आजगावकर, एम् ए. वाय. ११/१७०,
सरकारी वसाहत वांद्रे (पूर्व) मुंबई ५१

## खांबाची प्रतीक पूजा

● शिरडीतील एक दिव्य दिवस! बाबांना त्यांचे भक्त हे गुरुस्वरूप परमेश्वरच मानीत असत. दिव्यचरित्र, अद्‌भुतलीला, आणि अमृतमय उपदेश शब्द यातून साक्षात् गुरुत्वाचे शिरडीकरांना प्रत्यक्ष दर्शन घडत असे! एका गुरुपौर्णिमेला भक्तांनी श्रीबाबांची गुरुपूजा करावयाचे ठरविले. आपल्या सच्चिदानंद सद्‌गुरुचे ऋण मान्य करण्याचा आणि त्यातून अंशतः उतराई होण्याचा तो दिवस म्हणजे श्रीगुरु-पौर्णिमेच्या होता! सर्व पूजासाहित्य, पूजासंभार भक्तानी जमा केला. गुरुप्रेमाने ओथंबलेले भक्त द्वारकामाईत आले. परंतु बाबा तर नटनाटकी! त्यांना आधीच सर्व समजलेले! बाबाना पूजा स्वीकार नाही. त्यांनी द्वारकामाईत ज्या लाकडी-खांबाला टेकून ते धुनीसाक्ष बसत, आपल्या फकीर अवधूत गुरूंचे चिंतन व ध्यान करीत, सहजावस्थेत लीला करीत, त्या खांबाची पूजा करा असे भक्तांस सांगितले. जणू तो खांबच गुरुराज होता! सच्चिदानंद गुरुतत्त्व होता! त्या खांबाजवळ श्रीगुरु त्यांच्या पार्थिव देहाद्वारे लीला व चमत्कार घडवीताना लोककल्याण व लोकसंग्रह साधीत होते सर्वसिध्दांतून व्यक्त होणारे अवधूत फकीर दत्तांचे गुरुतत्व त्यांनी भक्तांना पूजावयास भाग पाडले. स्वतःच्या पूजेपेक्षा ही प्रतीक पूजा बाबांना मान्य होती. ते गुरूंचे बंदे यादगार होते!

## गुरु एक शक्ती

● श्रीगुरु हे व्यक्तिनिरपेक्ष आहेत. ते व्यक्ति नाहीत. एक शक्ति आहेत! तो विश्वात्मक, समर्थ, सच्चिदानंद सद्‌गुरु हाच खराखुरा जगद्‌गुरु आहे. ते त्रैमूर्त गुरु-दत्ततत्त्वच गुरुपदवीला समर्थ, पात्र आहे. योगी, सिद्ध, साधु आणि संतातून तेच प्रकटते, मार्गदर्शन करते. गुरूंची पूजा म्हणजे त्या स्थूलातून सूक्ष्माकडे नेणाऱ्या, अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या दिव्य भक्तीची पूजा, हेच बाबांनी वरील कथेत सिद्ध केले आहे.

ध्यानमूलं गुरो रूपं । पूजामूलं गुरोः पदम् ॥
मंत्रमूलं गुरो र्वाक्यं । मोक्षमूलं गुरुः कृपा ॥ (श्रीगुरुगीता)

## गुरु ध्यान हेच साधन

श्रीगुरुंच्या प्रेमाने जीवनाची वाटचाल सुखकारक होते. गुरु हेच्च ब्रह्मा विष्णु महेश आहेत. गुरुहेच सगुण निर्गुणाचे मीलन क्षितिज आहे! गुरुहेच मोक्षाचे साधन व साध्य आहे. दान यात्रा, व्रतें, वैकल्ये, यज्ञ, क्रिया ही केवळ विरक्ती निर्मितीसाठी व देहशुद्धीसाठी आहे. खरे ज्ञान गुरुकृपा झाल्यावाचून होत नाही! गुरुंनी शिष्याच्या प्राणमनाचा लय घडवावा लागतो, तेव्हाच आत्म्याची ज्योति प्रज्वलित होते. हे रहस्य गुरुगीतेत शिवाने पार्वतीस सांगितले. हेच ज्ञान गुरुभक्त नाथपंथीयांनी जगात प्रसारिले व ठसविले. गुरुगीता हेच नाथपंथी ज्ञान सांगते. साईबाबा हेच्च निराळ्या शब्दात सांगताना म्हणतात.

"तू माझ्याकडे पहा मी तुझ्याकडे पाहीन"

"सर्व विकार व वृत्ती गुरूपदी सोडा"

"श्रीगुरुंचे कीटकभ्रमर न्यायाने तैलधारावत् ध्यान करून स्वतःच गुरुरुप व्हा"

"तुमच्या माझ्यातील अहंकाराची भिंत पाडा-मग मीच तुम्हाला बोलवीन, चालवीन"

## गुरु शरण भाव

असा नामस्मरणाहूनहि सोपा गुरुध्यानाचा नाथपंथी मार्ग बाबा सांगतात. ध्यान कुणाचे करावे तर गुरुरूपाचे! पूजा गुरुपदाची! श्रवण गुरुवाक्याचे! आर्तता गुरुकृपेची! या गुरुप्रेमातूनच जीवन रसमय बनते. कृपा अदृष्टातन पाझरते गुरुशिष्याचे अद्वैत प्रेम मीलन घडते. दिव्य साक्षात्काराची प्रभात उदयाला येते. चित्त गुरुपदावर स्थिरवावे. दृष्टी गुरुचरणी लावावी. अहंकार परमेश्वराशी एकरुप करावा. देहभाव विसरून गुरुस्मरणात विलीन व्हावे. म्हणजेच गुरुकृपा होते.

"जो श्रीबाबांचे पद जाणे-त्या संसारी नच कांही उणे!"
जरि असार हा संसार बने-रस सार भरे गुरुप्रेम गुणे"

(श्रीसाईगीतायन)

प्राणपणाचा मी अद्भुत लय। अनाहूताचा ध्वनी नादमय।
मी तेजोमय ज्योती चिन्मय। धरूनि शक्तिकर हाती माझा कर
शून्यात प्रवेश"        (श्रीसाईगीतायन)

### श्रीगुरु पादुकांचे रहस्य

श्रीबाबांच्या खांबाच्या पूजेत दत्त व नाथपंथाच्या पादुका पूजेचे रहस्यमर्म भरलेले आहे. श्रीगुरु हे सगुणनिर्गुणाचे मीलनक्षितिज, ज्ञान अज्ञाताची सीमारेषा, स्थूल सूक्ष्माची सरहद्द आहे. म्हणूनच ही शक्ती आकार-निराकार यांचे चिन्ह म्हणून पादुकांच्या प्रतीकाने दाखविली जाते. सर्वसाक्षी सर्वव्यापी व सर्वशक्तिमान गुरुतत्व हे सर्वत्र वसूनहि चर्मचक्षूना अज्ञात असते. गुरुचरणांच्या पादुका चिन्हातून ते प्रगट होते ! दत्तांच्या पादुका तसा बाबांचा द्वारकामाईतील खांब या गुरुप्रतीकातून तुम्ही गुरुच पहा या प्रतीकाला मनावर ठसवा शिरावर धारण करा. यातच जीवनाचे साफल्य व गुरुकृपेचे रहस्य सामावले आहे !

॥ श्री साई प्रसन्न ॥

अकल्पीत द्रव्यप्राप्ती, सौभाग्यप्राप्ती

धन धान्यादी वृद्धी व सुखैश्वर्य

प्राप्तीसाठी

**श्री वरदलक्ष्मी षोडशोपचार**

**पूजा व व्रतकथा (प्राकृत)**

लेखकः ह. भ. प. आठल्ये शास्त्री

मूल्य २-०० रुपये

प्रकाशक
श्री. रघुनाथ गो. बेंडखळे
साडविलकर बुक डेपो,
७०/८०, जैनस्थानक, मुं. १२.

प्रमुख विक्रेता
तुकाराम बुक डेपो,
माधवबाग, मुंबई ४

# प्रियविलास भक्ति ( विरही-राधा )

—डॉ. के. भ. गव्हाणकर

इंदिरा निवास आग्रारोड,

कुर्ला, मुंबई ७०

● अत्युच्च भक्तीचा सोहळा प्रियविलासात भोगता येतो. विलास त्याला नाव की भोगलेलेच पुनः पुनः भोगावे असे वाटते, पण त्यात सुख थांबलेले नाही अशी अवस्था असते, त्यात गोडीची आत्यंतिक अवस्था असते पण क्रियेचा लक्षांश मुळीच असत नाही.

सारे जग इंद्रियाकरवी जे वस्तुभोग भोगतात, त्यात त्याना क्रियेची गोडी वाटते. मूळ प्रिय प्रीतीवर त्यांचा लक्षांश नसतो, वस्तुमात्रामध्ये गोडी आहे या लक्षांशाने जीव कर्मे करीत आहेत. कर्माची आसक्ति रहाते, पण त्या दृष्टीमुळे संताপच. त्याचे सुखहि नाश पावल्यासारखे त्यांना वाटते, कर्मांबरोबर त्यांचे सुखहि चंचल होते, जीवातली सुखाची आस पुरत नाही.

कर्मावर नजर न रहाता कर्म व ज्ञान ज्या प्रियतेतून त्यावर ज्यांची नजर ते भक्त होत. ज्ञानाची ज्ञानाला जी परमप्रीति ती प्रियतेची प्रथम तनू आहे, कर्म व्यक्त होण्यापूर्वी, कर्म असताना व कर्म थांबल्यावरहि ही प्रियता स्वगोडीने प्रत्येक, जीवितात अखंड असते. त्या प्रियतेची गोडी ज्यांच्या जीवितात स्पष्ट झाली ते भक्त होत. त्या प्रियतेची गोडी, आसक्ति कर्म असो वा नसो कधी कमी होणार नाही. त्या गोडीच्या आसक्तीत कर्म लक्षांश रहात नाही आणि त्या प्रिय आसक्तीतच विलास उमलत रहातात. जे प्रियरूप भोगात आहे ( गोडीत जडले आहे ) तेच तेच पुनः पुनः भोगावे कर्म घडो वा न घडो केवळ स्मृतीने ते प्रतीतीत अनुभवावे हे प्रियविलासाचे रूप आहे. कर्मलक्षांशाने जी प्रीतीची गोडी त्या गोडीचा नाश होतो, त्याला विलास हे नाव नाही.

मोठी वस्तू तीच की जी कधीच गमावली जात नाही. जिचा मोठेपणा कधी कमी होत नाही तिचा मोठेपणा स्वयंभू असतो इतरावर अवलंबून नसतो आणि त्या मोठेपणाला इतर कशाचेही तोल नसते. जीवनातील प्रियगोडी ही अशी एकमेव श्रेष्ठ प्रतीति आहे त्या प्रियतेत सर्व अवस्थांचा जन्म आहे. त्या प्रियप्रेमालाच ईश्वर हे नाव शोभते. त्या प्रियसत्तेलाच श्री साईविठू म्हणतात.

त्या साईविठूच्या स्मरणाने प्रियविलासी भक्त निजानंद भोगत असतो. त्या विलासी प्रिय आसक्तीला कर्माची नड नाही, कर्म लक्षांश नाही. प्रीतीच केवळ वाढत रहावी एवढी आवड उरलेली आहे. त्या आवडीत सुखाची आत्यंतिक इच्छा आहे. पण त्यातील सुख पुरत नाही असे वाटत आहे. आस वाढती आहे हेच खरे विलासाचे लक्षण आहे. विश्व हा असा प्रियप्रभूचा चिद्विलास आहे. प्रियसत्तेला आपली प्रियप्रतीति पुरत नाही म्हणून अपार गोडीने ती आपआपल्याला प्रसवत आहे प्रतीतीत अवतरत आहे. हा तो चिद्विलास होय. भोगलेलीच अवस्था ज्ञानाला न पुरणे हा चिद्विलास. प्रकाशात अंधार हा कधीच असू शकत नाही. त्याप्रमाणे प्रियगोडीत खंड नाहीच. प्रकाशात अंधाराचे फक्त स्मरण तसे कर्म लक्षांशाने सुख हरवलेसे वाटणेच केवळ आहे.

ज्ञानाच्या प्रियतेवर जे अखंड जडले त्यांना प्रियगोडी हरवलीच नाही. ज्ञानाच्या कृतीवर लक्ष राहिल्याने त्या गोडीला जीव साक्षी होतात. उलट भक्त त्या प्रियतेवर नजर राहिल्याने स्मरणाने ती प्रीति अखंड भोगीत रहातात.

क्रियेने सुख भोगावे ही नीति जेथे, तेथे स्त्रीपुरुष, आई-बाप व पुत्र या सर्व नात्यातही भांडणे आहेत. जेथे प्रियतेची नजर तेथे सर्व काही गोड आहे. या नजरेने ज्याला ईश्वर शब्द उच्चारता येतो तेथे उच्चाराबरोबर ईश्वर प्रतीति होते.

चंद्राचा प्रकाश विश्वभर असला तरी त्याचा उगम पूर्णत्व ज्याप्रमाणे त्या बिंबामध्ये त्याप्रमाणे विश्व प्रतीति ज्या ज्ञानाने प्रियतेचे मनुष्यशरीर हे बिंब आहे. पूर्णत्व आहे. त्या शरीरातच ती प्रियसत्ता व प्रियप्रतीति व्यक्त होत आहे. प्रतीतीची प्रियता जेथे व्यक्त तेथेच विरह शक्य आहे. मी हरीच आहे, प्रभु आहे असे म्हणण्यापेक्षा मी हरीचा प्यारा आहे असा अठव असणे श्रेष्ठ होय. हरीशी ऐक्य आहे असे म्हणण्यात त्याहून साक्षी ( वेगळा ) आणि हरीचा प्यारा असे आठवण्यात त्या प्रियत्वाशी प्रतीति मिळन रहावे. मीच बाप म्हणण्यापेक्षा मी त्या बापराजाचा असे आठवण्यात बापाहून बाल वेगळा उरत नाही प्रियत्वात बापरूपाशी तो एकरूप होतो.

कृष्णप्रभुंची गाणी गाता गाता सर्व गोकूळ वेडावून गेले. प्रेमपिपासी जीव अद्यापहि त्याच प्रेमाची गाणी गात वेडावून जातात, त्या वेड्यांचा धर्म मुसलमानी असो हिंदु असो की कोणीही असो. त्यांची जात त्या कृष्णलीलांची गाणी गाता गाता गोपी-राधिका होऊन जाण्याची असते.

' व्यासोच्छिष्टं जगत्रयं ' एवढे ज्ञानी पुरुष व्यास पण गोपीगीत गाऊन ते सुखी झाले, एरव्ही सरस्वती तीराला आपल्या विद्वत्तेचे ओझे व दुःख होऊन ते रडत बसले होते. ज्ञानाच्या ज्ञानाचा शीण उतरावयाला गोपी गीताच्या प्रेमसरोवरात

जाऊन बुडी मारण्यासाठी कासावीस झाले नाहीत असे ज्ञानी पुरुष विरळे. श्रीज्ञानेश्वर माउली ज्ञानाचा ईश्वर पण तेही विरहिणी-बाई झाल्या आणि कामिनी झाल्या.

प्रभूच्या भेटीस्तव आर्त ऐकून राधिकेच्या वेदना त्यांच्या अंगी उमटू लागल्या. प्रत्येक प्रेमी असाच त्या कृष्णसख्याच्या ‘ प्रेम-नटरंगी रंगलेल्या प्रभूच्या ’ विरहाला वेडावलेला असतो. सूफी पण कृष्णाची गाणी या विरहानेच गातात. संतही सर्व तत्वज्ञान, बोध आटपून या विरहसुखात प्रियविलासात रमलेले असतात. अशा या गोपीप्रेमाची-गीताची ही कोण लोभनीय गोडी असेल ! त्या गोपीनी राधिका श्रीकृष्ण प्रभुच्या एवढ्या लाडक्या का होऊन बसल्या होत्या असे कोणालाही वाटेल.

श्रीकृष्णप्रभूच्या अर्धांगी, मातोश्री रुक्मिणीदेवी यांना पण असेच वाटले होते. प्रभूच्या अर्धांगी तेव्हा आपणाहून अधिक प्रिय कोण स्त्री असेल असा अभिमान त्यांना असणे सहाजीक होते. पण एके रात्री प्रभू झोपेत ‘ राधे राधे ’ म्हणून ओरडून ‘ नको असा माझा त्याग करू ’ असे काकुळतीला असलेली वचने बोलू लागल्याची जागी होऊन ऐकल्यावर त्यांच्या चित्ताला केवढा धसका बसला ! केवढे आश्चर्य वाटले ! आणि केवढा त्या अज्ञात ‘ राधेचा ’ राग पण आला ! पण मोठ्यांची सर्व तऱ्हा मोठी तो राग दाखविण्याची व आपल्या अंत:करणाला सूड प्रगट करण्याची त्यांची तऱ्हाही वेगळीच. प्रभू ‘ राधे राधे ’ करून विनवित शोकवेगाने जागे होऊन पहातात तो मातुःश्री पायापाशी जाग्या असून खाली मान घालून अश्रू ढाळीत आहेत. एवढा प्रभू खरा पण त्या प्रसंगाने अगदी चूर होऊन गेला. देवी आपल्या उद्गारांचा कोण अर्थ लावून रडत आहेत हे तात्काल त्यांच्या ध्यानी आले. जीवन प्रेमविरहाच्या कळा ज्यांच्या अंगी उमलल्याच नाहीत त्यांना त्या अवस्थेचे स्पष्टीकरण करणेच अशक्य असते. पहाणारा स्वतःच्या कामिक दृष्टीने पाहून निर्व्याज, प्रेमास्तव झुरणाऱ्या प्रेमालाहि कामिकच समजतो. जो जो समजविण्याचा प्रयत्न करू म्हणावा तो तो नेमका त्याच्या विरुद्ध अर्थ समजला जाणार.

आपले मौन व येणाऱ्या आवेगाला वाट देणेच हा त्यावरील उपाय प्रभूने अवलंबिला. प्रभू उठले हे जाणून मातुश्री अति अनन्यभावाने त्यांच्या पाया पडल्या. किती वेळ झाला तरी मस्तक तेथून निघत नाही व पाय अश्रूंनी ओलेचिंब झाले तेव्हा प्रभु म्हणतात, ‘एवढी ही विनवणी आज कशासाठी बरे ? मातोश्री रडतच म्हणतात, ‘मी एवढी अभागिनी, प्रभूच्या जवळ राहून दासी होण्याचे देखील माझे भाग्य नाही. जिने आपले सर्वस्वच चोरले गाढ निद्राहि चोरून नेली त्या सभाग्य राधिकेचे चरणदर्शन मला अभागिनीला आपण घडवाल का ? आपण होय म्हणाल

तरच हे चरण सोडते ' तिच्या पायाच्या धुळीने तरी पावन होऊन प्रभूच्या दासीपणाला आम्ही लायक होऊ ! वाक्ये थोडी पण, ती हुंदक्याच्या श्वासाच्या अवरोधाने तुटून तुटून इलके सावकाश निघत अश्रूंचा पूर आणीत होती. वाक्ये किती नम्र अश्रु किती सत्य पण त्या नम्र मृदु वचनामागेच अंतरीच्या असूयेचा तीव्र दाह होता. प्रभु ते सारे जाणून म्हणाला आपण ते मनावर घेऊ नये. मला उगीच काहीतरी स्वप्न पडले...काहीतरी कसे ?...आवरलेला क्रोध आटोक्याबाहेर पण सावधगिरीने बाहेर येऊ लागला. 'झोपेत देखील तिने आपली पकड या जगदीशावर बसविली ती बाई सामान्य कशी असेल ?' "तसे नव्हे हो...कधी कधी झोपेत बरळण्याची वाईट खोड मला आहे." 'सर्व जगाला ताब्यात ठेवणारे सर्वसत्ताधीश व ज्ञानी–आणि ते उगाच कसे बरळतात ! मला आपली उगीच समजूत घालता अं ?" असे म्हणून पुन्हा अंग लोटल्याप्रमाणे अनावर हुंदके सुरू झाले.

प्रभुला त्यातून मार्ग कसा काढावा हे काही सुचेना. मातोश्री तर अगदीच वेदनाकुल होऊन 'मला त्यांचे दर्शन घडवा हो...माझी एवढी आस नाहीच का पुरवणार ?' म्हणून हट्ट घेऊन बसलेल्या राधिकेची प्रभु सर्व स्थिती जाणीत होते. आणि म्हणूनच प्रेमसाक्षी अर्धान्गीला देखील तेथे न्यायला नको म्हणत होते.

अर्धांगीलाच काय पण प्रभु स्वतःहि तेथे जाण्याला भीत होते. पदोपदी तिकडे जावे म्हणून पाऊले ओढत होती पण जीव तेथे जाण्याला भीत होता. राधिकेची अवस्थाच तशी विशेष होती प्रभु सर्वांना मथुरेहून आल्यावर भेटला पण राधेकडे जाण्याला आपल्या असह्य प्रेमवेदनामुळे दबला,

राधा व कृष्ण विरहात-प्रेमविलासात एकजीव होते. पण सगुण देहाबद्दल, कर्माबद्दल राधिकेला-प्रेमाला असह्य वेदना होत होत्या व तेथे तिने मिटलेले डोळे उघडले नाहीत तर जीवन राखणे अशक्य होईल म्हणून तेथे जायला प्रभु नको म्हणत होते. रुक्मिणीला तर त्या प्रेमव्यथेचे काहीच उमगणे शक्य नव्हते. बाह्यक्रियावरून जेथे प्रभुविषयी अनादर तेथेच त्याचा लगटपणा, अशा कल्पना तिने बांधल्या असल्या म्हणून कृष्णप्रभु रुक्मिणीला तिकडे न्यायला नको म्हणत होते.

पण अजाण म्हणूनच अनावर अशा हट्टाला आवरायचे कसे ? मातोश्रीच्या तगादयाला अखेरी 'होय' म्हणाले. आणि रथ सज्ज करून राधिकेच्या गोकुळातील मंदिराकडे निघाले. मंदीर दोन फर्लांग आहे तोच रथ एकदम उभा करून 'मी पुढे जाऊन पाहून येतो' म्हणाले. मातोश्री म्हणाल्या 'सारथ्याला पाठवावे' नको नको मी आलोच म्हणून उत्तर-प्रतिउत्तराला अवकाश न देता पुढे लागलीच सटकले.

इकडे राधिका आपल्या मंदिरात एका पलंगावर निवांत नेत्र मिटून उगाच अश्रू गाळीत होत्या. बाहेर त्यांनी आपल्या विश्वासाच्या रंगी दासीला ठेवून "कोण-लाहि आत सोडू नको" म्हणून सक्त आज्ञा केली होती. 'कोणालाहि म्हणजे कृष्ण प्रभुलाही ना?' असे त्या सूज्ञ रंगीने विचारल्यावर "हो हो प्रभुलाहि" असे निर्धार वचनांनी सांगितले.

रंगीदासी बाहेर दारावर होती आणि राधाबाई आत काय करीत होत्या? कृष्ण प्रभु वेध लावून नंतर एकाएकी सोडून मथुरेला गेला. त्याचे अवतारकार्य प्रेमरज्जूंना तोडून आपणापासून त्या प्रेमदेवाला ओढून नेते हे त्या प्रेमसुखाने नाजुक हळुवार झालेल्या हृदयाला सोसले नाही. राधा रथापुढे आडवी होण्याला, मातीत मुख घासावयाला गेली नाही पण तिने हा सत्ताधीश कर्मकर्ता प्रभु आपल्या जवळून केव्हा निघून जाईल याचा नेम नाही म्हणून स्वबोधात खूणगाठ बांधून ठेवली. कृष्णसंग-तीचे त्याच्या मधुरप्रिय वचनाचे, त्याच्या गोड सस्मित बघण्याचे त्याच्या हास्य-विनोदाचे, त्याच्या दर्शनाचे, तो जवळ आहे तो आपला आहे या गोड भावनेचे सुख या सर्व संगाचे सुख अद्याप तिच्या नसानसातून रसरसत होते. येणारा प्रत्येक क्षण कृष्णाच्या दर्शनावाचून जातो ही असह्य वेदना भोगलेल्या सुखामुळे वाटत होती. प्रभु नित्य जवळ पाहिजे आणि तो तर आता भेटणेही अशक्य ही स्थिती तोच ती दुःखाने पार वेडी पिशी झाली, आणि त्यातच तिला अनिवार बोध व सुख भेटले.

कृष्णप्रभु कधी येईल कधी जाईल, त्याचा आठव मात्र कधी जाणे शक्य नाही. भेटीच्या वचनाच्या आठवाबरोबर विरहवेदनातच-प्रियविलासातच त्याच्या प्रत्यक्ष संगापेक्षा अधिक रमणीय सुख आहे हा अनुभव तिला आला. हा विरहकल्लोळाचा कृष्ण सखा जवळून कधीही जाणे शक्य नाही म्हणून त्यालाच जवळ करून आता बाहेरचे जग पहावयाला नको. तो आकाराचा कर्मरूप कृष्णहि पहावयाला नको. म्हणून राधिका आपले डोळे मिटून त्या रासलीला आठवीत आपले जीवन विरहाने रमवीत होती.

प्रभु दाराजवळ आले त्यावेळी राधिका त्या रासलीलेत मग्न असून, प्रभुने आपल्या गालावर गाल ठेवून ज्या रमणीय कला अंगी उमलविल्या त्याच विरहाने प्रभु जवळ का येत नाही म्हणून आठव करीत होती. प्रभु मंदिराजवळ येऊन पहातात तो दारावर रंगी दासी उभी–ते तसेच आत जाऊ लागले. तो दोन्ही हात आड करून ती आडवी झाली. 'रंगे मला तू ओळखले नाहीस?' प्रभु! ओळखले पण आत

कोणालाहि जाण्याची परवानगी नाही 'मलाहि नाही' 'हो आपणालाहि नाही" "रंगे! मीच तुझी येथे नेमणूक केली आणि मला तू बंदी करतेस" "महाराज, आपण माझी नेमणूक केली पण ती स्वामिनीची आज्ञा पाळण्याकरिताच ना?" प्रभु म्हणाले मी तसेच आत गेलो तर? विवादाने ती जिंकण्यासारखी नाही हे जाणून प्रभु अखेरीस म्हणाले मग मी काय करणार?— "आपण समर्थ आहात" रंगी बाह्यतः विषादाने पण अंतरी होणाऱ्या भेटीच्या गुदगुदल्या होऊन म्हणाली.

रुक्मिणीला आपली ही दशा राधिकेच्या नोकराकडून झालेली पाहायला नको म्हणून रथ दूर उभा करून प्रभुला पुढे येणे भाग पडले होते. रस्ता मोकळा होताच रुक्मिणीदेवींना त्यांनी पाचारिले.

आत जाऊन पहातात तो राधिका सर्व केस अस्ताव्यस्त सुकलेले अशा स्थितीत डोळे मिटून शांत मधुर वाणीने "कृष्ण कृष्ण" उच्चारीत पडलेली दोघांनी पाहिली.

प्रभुने राधिकेच्या कानापाशी "राधे राधे" अशा हलकेच हाका मारिल्या. पण राधा डोळे उघडण्याच्या अवस्थेत नव्हती. हाक ऐकू जाऊनहि नको त्या अंतरिच्या रमणीय सुखात व्यत्यय असे तिला वाटत होते. "राधे एकवार डोळे उघडून बघ ना!... माझ्यावर तू अशी रागवलीस?" असे काकुळतीने प्रभु म्हणाले तेव्हा डोळे न उघडताच राधिका बोलू लागली "प्रभु! मी रागावले नाही. पण नको ते डोळे उघडणे असे वाटते" "राधिके मला पाहू नये असे तुला वाटते का?" "प्रभु तुझ्या दर्शनापेक्षा आता तुझ्या स्मरणात अति बरवे वाटते! आता तुला डोळे उघडून पाहू आणि तू निघून गेलास म्हणजे माझ्या डोळयाची आग कोठे सिटवू?" राधिके तुला त्या सुखाची गोडी लागली म्हणून ज्याच्यामुळे ते सारे लाभले त्या सगुणरूपाला तू नको म्हणतेस? राधे! तुम्हांला हा सगुण अवतार नको म्हणता येईल.... पण मी सगुणाशिवाय कसा राहू ग? तुम्ही या सगुणाचा त्याग केला तर मला सगुणरूप कोण देईल बरे? भक्त माझ्या सगुणाची आस करतील तरच मला सगुणरूप घेता येईल; तरच माझे सगुण राहील! नको नको ग माझा असा त्याग करू? असे म्हणून न राहून राधिकेला प्रभुनी आपल्या छातीशी धरिले आणि तिच्या नेत्राची केसाची चुंबने घेतली. प्रभुचे हे हृदयाला जखम करणारे त्याच्या सगुण आकारास्तव काकुळतीने केलेले भाषण ऐकूण मात्र राधिकेने डोळे उघडले आणि म्हणाली, "कृष्णा काय करू सांग? तुझ्या रुपाला पाहू नये असे मला वाटले? त्या सगुणप्रेमकल्लोळानेच आम्ही जगलेले पण तूच पहा सख्या! त्या रासक्रीडेच्या वेळी तू आपल्या हाताने वेणी घातलीस, तिच्या या या पहा कशा जटा

झाल्या आहेत ! प्रभु तुझ्या स्पर्शावाचून मी त्यांना स्पर्श करायला धजत नाही, प्रभु हा गुलाल पाहिलास का ? तो रासक्रीडेत तू आपल्या हातांनी घातलेला तो तसाच आहे बरं, असे म्हणून तिने आवेशाने ताडकन् एक बट ओढून ती उपटून प्रभुपुढे धरली आणि ती प्रभुला बिलगता बिलगता आत्यंतिक शोकाने रडू लागली. -प्रभुही त्या पुरात आपले हृदय विरवून स्फुंदून उसासत होते.

प्रथम काही कानडे वाटणाऱ्या रुक्मिणी मातुश्रींनी तो प्रेमकल्लोळ, ती विरहावस्था व रासक्रीडेच्या काळापासून राखलेल्या त्या जटा व राधेचे ते दर्शन पाहून त्याच्यातही त्या प्रेमाचा कल्लोळ आला व त्या दोघांच्या मिलनात त्यांच्या पायावर मस्तक ठेवून आपल्या केसानी त्यांची झाडणी केली. नंतर उठून त्यांनी त्या प्रेमकल्लोळाला पाच प्रदीक्षिणा घातल्या, व त्यांच्या पायी नवस केला, की ' मला राधेच्या प्रेमाच्या (भक्तहृदयाचा) अंश तरी लाभावा. '

रुक्मिणीदेवी तेथून प्रभूच्या भक्त झाल्या. एरव्ही त्यापूर्वी देवी लक्ष्मी एवढी जवळी का तेही या प्रेमाचे सुख या स्थितीत होत्या.

प्रभु राधिकेकडे त्या दुःखद प्रसंगासाठीच जायला नको म्हणत होते, पण अंतरी वेधाने जळत होते. राधिकेने सगुणाची आस सोडली म्हणून ते अत्यंतिक दुःखी झाले होते, व त्या दुखामुळेच रात्री दचकून 'राधे राधे' नको ग माझा असा त्याग करू' म्हणून विव्हळत होते.

एका प्रेमानेच राधिकेचा विरहहि वाढविला आणि प्रभु ज्या प्रसंगाला भीत होते तो प्रसंग मुदाम घडवून आणून सगुण प्रभूची सगुणरूप राखण्याची स्थिती निर्माण केली.

प्रेमाचा महिमा अगाध आहे त्याचे रूप अतर्क्य आहे त्याच्या क्रिया अनिश्चित आहेत.

विधि वा अविधि, सुख वा दुःख या सर्वातून एका रमणीय विरहवेदनाच्या कळीने ते प्रेम सर्व सुखाचे विश्व हालवीत आहे एवढे मात्र खरे.

त्या प्रेमाचा अत्यंत रमणीय सर्वांगपरिपूर्ण असा खेळ श्रीकृष्णप्रभूच्या चरित्रात भेटल्याने सर्व ज्ञानी प्रेमी त्या कृष्णत्मीत्यांना त्या गोपीगीताना एवढे मोहून असतात.

तेव्हाच तो गोकुळचा कृष्ण आज सदेह गोकुळात प्रेम मुरलीने सर्वांना वेधीत आहे. संत या त्या कृष्णाच्या जिवलग सख्या प्रेमसंगी विरही बाला आहेत. त्यांची रचने हाच रस असून भजन हाच कृष्णसंग आहे.

# पूज्य श्री मोटा महाराज

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर ( निवृत्त )
१/१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंटस बंड गार्डन रोड,
–पुणे ४११००१

● आज आपल्याला मी गुजरातेत नुकतेच होऊन गेलेल्या एका महात्म्याविषयी सांगणार आहे. विशेष म्हणजे त्यांना श्रीसाईबाबांचा व साकोरीच्या उपासनी महाराजांचा अनुग्रह झाला होता.

त्यांना सर्व लोक " श्री मोटा " या नावाने संबोधीत परंतु त्यांचे मूळ नाव श्री चुनीलाल आशाराम भगत असून त्यांचा जन्म भूतपूर्व बडोदे राज्यातील सावली गावी ता. ४-९-१८९८ रोजी झाला होता. त्यांचे वडील रंगारी जातीचे होते. ते सन १९१९ साली मॅट्रीक झाले व १९१९-२० साली बडोदा महाविद्यालयातहि शिकले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांना लहानपणीच नोकरी करावी लागली होती. त्यामुळे त्यांचे लक्ष व्यवसायकरून आपल्या कुटुंबियांचे पोषण करण्यातच जास्त होते.

यानंतर थोड्याच वर्षांनी ते अध्यात्माकडे कसे ओढले गेले व १५ वर्षातच मुक्तावस्थेत कसे पोहोचले ही गोष्ट फारच मनोरंजक व आश्चर्यकारक आहे.

१९२४ साली नडीयाद येथे असताना त्यांच्या एका नातलगाने येऊन सांगितले की कोणी एक साधु आला आहे. गावाबाहेर उघड्यावर बसला आहे व सारखा म्हणतोय " चुनीलाल भगतको बुलाव, चुनीलाल भगतको यहाँ लाव " तेव्हा मोटा म्हणाले माझा त्याच्याशी काय संबंध ? मी कशाकरिता त्याचेकडे जाऊ ? परंतु काही दिवसानी त्यांना बुद्धी झाली की तो अनोळखी साधु आपणाला बोलावतोय तरी कशाकरिता पाहू या ! म्हणून ते त्या साधुकडे गेले. त्याने मोटांना बसविले व म्हटले मला माझ्या गुरुनीं ज्याचे नाव धुनीवाले दादा आहे त्यांनी तुला घ्यायला पाठविले आहे तर तू चल " नंतर त्या साधुने मोटांना एकसारखे मिठाई खाऊ घालावयास सुरवात केली. त्या साधुने येवढी व इतक्या प्रकारची मिठाई कशी उत्पन्न केली व ती आपल्याला कशी खाता आली याचे राहून राहून मोटांना आश्चर्य वाटू लागले व त्यांनाही इच्छा झाली की आपल्या जवळ पण अशी शक्ती असावी. मात्र त्यांचे बरोबर जाण्यास मोटांनी नकार दिला व गावात परत आले.

असेच काही महिने गेले व एके दिवशी मोटा रेल्वे स्टेशनवर बाहेर गावी जायचे तिकीट काढून गाडीत बसायला जात होते तो त्यांना प्लॅटफॉर्मवर ते पूर्वीचेच साधु दिसले. त्यांचे नाव श्रीबालयोगी होते. मोटानी थांबून त्यांना नमस्कार केला तर ते म्हणाले, " तिकीट परत कर व मला एकांतात तळ्याशेजारी असलेल्या एका बंगल्यात घेऊन चल. मी तुला दीक्षा द्यायला आलो आहे. " मोटांना काय करावे समजेना–असा बंगला कुठून शोधायचा व आपल्यासारख्या गरीब माणसाला तो कोण देणार ! परंतु त्यांनी तिकीट परत केले व घरी गेले. सारखा विचार चालला होता बंगल्याबद्दल. योगायोग पहा ! एका मुसलमान सद्‌गृहस्थाला मोटा रोज येता जाता सलाम करीत असत. त्यांना त्यादिवशी ते सलाम करायला विसरले. तेव्हा त्यांनी मोटांना बोलावुन विचारले, " आज कसल्या विचारात दंग आहेस ? मला सलाम नाही केलास ? " त्यावर मोटांनी त्यांना सकाळची स्टेशनवरची हकीगत सांगितली. तेव्हा ते सद्‌गृहस्थ म्हणाले, " अरे, तळ्याशेजारचा एक माझा बंगला आहे की. रिकामाच आहे. घे ही किल्ली. " मोटांना काय आनंद झाला म्हणून सांगावा ! ते धावतच त्या बालयोगींकडे गेले व त्यांना घेऊन बंगल्यावर गेले. तिथे खरोखरच त्यांनी मोटाना विधीपूर्वक दीक्षा दिली व तेव्हापासून मोटांचे आयुष्यच बदलून गेले. त्यांच्या आध्यात्मिक जीवनाला सुरवात झाली. ते एकांत शोधू लागले व साधना करू लागले.

असाच काही काळ गेला व एके दिवशी नडीयाद येथे असतानाच मोटांना कळले की कुणीतरी एक व्यक्ति अगदी नग्न अवस्थेत झाडाखाली झोपलेली आहे. मोटांनी विचार केला की अगदी नग्न अवस्थेत फक्त दोनच व्यक्ति फिरू शकतात– एक तर अगदी वेडा व दुसरा उन्मनी अवस्थेतील अवधूत. तर ही कशावरून दुसऱ्या प्रकारची व्यक्ति नसेल ? पाहू या तरी. असा विचार करून ते दूध वगैरे घेऊन त्याचे जवळ गेले व त्याचे लक्ष आपल्याकडे केव्हा जाईल याची वाट पहात बसले. एक दीड तासाने त्या व्यक्तिने मोटाकडे मान वर करून पाहिले व मराठी भाषेत तू मला मुसलमानाच्या घरी घेऊन चल. असे म्हणाले, मोटांना प्रश्न पडला की मुसलमान आणि अशा नग्न माणसाला घरात राहू देणारा माणूस कुठे आणि कसा मिळवावयाचा ? तरी पण त्यांनी प्रयत्न करायचे ठरविले. गावात एक ओळखीचा म्हातारा मुसलमान होता त्याचेजवळ ही गोष्ट काढली, व त्याचे माडीवर या व्यक्तिला ठेवून घेण्याचे कबूल करून घेतले. मोटांनी हेही त्याला सांगितले की या व्यक्तिची सर्व सेवा मल मूत्र काढणे वगैरे ते स्वतः येऊन करतील. पुढे जेव्हा मोटांनी ती व्यक्ति अगदी नग्नावस्थेत आहे असे म्हटले तेव्हा मात्र तो मुसलमान कांकू करू लागला. परंतु मोटांनी मी त्याला टांग्यातून

उतरविताना कमरेस फडके गुंडाळून आणीन असे कबूल केले तेव्हा तो तयार झाला. याप्रमाणे मोटांनी त्या व्यक्तिला त्या मुसलमानाच्या घरी ११–१२ दिवस ठेवले व त्याची सर्वप्रकारे सेवा केली. नंतर त्या व्यक्तिने परत जायची इच्छा दर्शविली व मोटांना म्हणाले की तूही माझेबरोबर चल. परंतु मोटांना आपल्या आई व वडिल भावाच्या कुटुंबियाना पोसावयाची जबाबदारी टाकून जाण्याचे पसंत पडले नाही असोः

ती व्यक्ती गेल्यावर एक–दोन दिवसानी तो मुसलमान मोटांना भेटला तेव्हा म्हणाला, " मोटा ! तुम्ही मोठे भाग्यवान् आहात. ती व्यक्ती म्हणजे खुद्द साकोरीचे उपासनी महाराज होते. ही गोष्ट मला त्यांचेशी सहज बोलताना कळली. " हे ऐकून मोटांना फार वाईट वाटले. असेच काही महिने गेले व एके दिवशी उपासनी महाराजांनी मोटांना अचानक दर्शन दिले व तू का माझ्याकडे येत नाहीस असे विचारले. मोटांनी म्हटले मला भाड्यासाठी पैसे मिळाले तर येईन. दुसरे दिवशी मोटांना कुठून तरी रु. ४५ मिळाले व ते लगेच साकोरीस रवाना झाले.

साकोरीस गेल्यावर तिथे पाहिले तो उपासनी महाराज एका पिंजऱ्यात बसले होते. मोटांनी त्यांना बाहेरून नमस्कार केला व त्यांचेकडे टक लावून पहात बसले. बऱ्याच वेळानंतर मोटांना लघुशंका लागली व ते उठू लागले परंतु त्यांना उठताच येईना मोटांना वाटले त्यांचे पाय अवघडले असतील परंतु नंतर त्यांच्या लक्षात आले की त्यांचे पाय जणू काय जमिनीला चिकटलेच आहेत. खूप प्रयत्न करूनही त्यांना हालता न आल्याने शेवटी त्यांना तेथेच लघवी झाली. पुढे शौचासही त्यांना हालता येईना व त्यांचे भोवती घाण झाली. तरीपण मोटांचे ध्यान मात्र उपासनी महाराजांकडेच लागले होते. आजूबाजूचे लोक मोटाना घाण केल्याबद्दल शिव्या देऊ लागले व दगडही मारू लागले, परंतु मोटांना त्याचे काही वाटले नाही. त्यावेळी मात्र १३-१४ वर्षाची एक मुलगी तिथे होती जी सर्वांना मोटांना न मारण्याविषयी विनंती करीत होती. ती मुलगी म्हणजे आजच्या साकोरीच्या पूज्य श्री गोदावरी माताजीच होत. असो अशाप्रकारे मोटा तिथे ११ दिवस बसून होते. नंतर त्यांनी पाहिले की त्यांचा एक पाय जमिनीपासून मोकळा होतोय. लगेच ते उठले. आधी सर्व जागा साफ केली, पाण्याने धुतली. गुलाबपाणी वगैरे टाकून सुवासित केली व स्वतः चांगल्याप्रकारे स्नान करून महाराजांजवळ पुन्हा येऊन बसले व नमस्कार केला. तेव्हा महाराजांनी त्यांना आशिर्वाद देऊन म्हटले की आता तू नडीयादला परत जाऊ शकतोस तुझी ही अवस्था कायम राहील.

पुढे सन १९३८ सालची गोष्ट त्यावेळी मोटा कराची येथे होते. एकदा समुद्रावर फिरायला गेले असताना त्यांना श्रीसाईबाबांनी दर्शन दिले आणि सांगितले तू समुद्रात चालत जा मोटा लगेच किनाऱ्याकडून समुद्रात चालत गेले. हळू हळू पाणी छातीवरून गळ्यापावेतो येऊन पोहोचले. तरी बाबांची आज्ञा म्हणून तसेच ते पुढे गेले. त्यांचे डोक्यावरून पाणी गेल्याबरोबर काय झाले कुणास ठाऊक. मोटा किनाऱ्याकडे परत फेकले गेले आणि जेव्हा शुद्धीवर आले तेव्हा त्यांचे कपडे वाळलेले होते. म्हणजे मोटा बरेच तास बेशुद्ध होते. असो.

पुन्हा एकदा कराचीतच असताना बकरी ईदच्या दिवशी मोटांना मुसलमानाबरोबर नमाज पढायला जायची प्रेरणा झाली. त्यांचे नातलग त्यांना असे वेड्यासारखे करू नका म्हणाले. तिथे धोतर टोपी घालून गेल्यावर एकादेवेळी मुसलमान पिटून काढायचे. तरी मोटा तिथे मैदानावर गर्दीत गेलेच व नमाज पढून संपविली. तो काय आश्चर्य! श्री साईबाबा त्यांचे समोर प्रगट झाले व खांद्यावर थोपटून म्हणाले, "शाबास, बेटा! लेकीन अब यहाँ सब कपडे उतारो और घर वापस नंगे चले जाव." मोटांना ही विचित्र आज्ञा ऐकून काय करावे समजेना. अशा प्रकारे कराची शहराच्या रस्त्यांवरून जायचे म्हणजे संकटाला आमंत्रण द्यायचे. न जावे तर गुरुंच्या परिक्षेत नापास व्हायचे, आणि आध्यात्मिक उन्नतीला हरताळ फासायचा. पुन्हा अशी संधि आयुष्यात कदाचित् यायची पण नाही. शेवटी मोटांनी बाबांच्या आज्ञेप्रमाणे करण्याचे ठरविले. ते एका मित्राकडे गेले ज्याला आध्यात्मिक गोष्टी काहीशा कळत होत्या. त्याला सर्व गोष्टी समजावून सांगितल्या व म्हणाले मी तुला येथे कपडे उतरून देतो. तू ते सायकलवर माझ्या घराजवळ घेऊन जा व तिथे थांब. मी कसा तरी तिथे येऊन पोहोचेन. काळजी करू नकोस.

नंतर मोटांनी कपडे काढले आणि त्यांना काय आनंद झाला म्हणून सांगू. मोटा म्हणतात त्यांना स्वतःला त्या आनंदात ते कुठे होते याचे भानच नव्हते. तसेच ते ६-७ मैल कराचीच्या रस्त्यावरून भर दिवसा व गर्दीत कसे पळत गेले हेही त्यांना समजले नाही. त्यांना फक्त एकच आठवते की त्यांची वाट एका गोऱ्या सार्जंटने (त्याकाळच्या पोलीस सब-इनसपेक्टरने) अडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते खूप मोठ्याने ओरडले. ते ऐकून तो सार्जंट बाजूला झाला व मोठ्याने म्हणाला "साईबाबा! ईद मुबारक!!"

असो. ही मोटांची शेवटचीच परिक्षा होती. त्यानंतर मोटांची आध्यात्मिक प्रगति खूपच वेगाने वाढली व लवकरच फळास आली. आधी त्यांना सगुण ब्रह्माचा

साक्षात्कार झाला व त्यात त्यांना श्रीकृष्ण भगवानांचे २-३ वेळा दर्शन झाले आणि शेवटी २९ मार्च १९३९ रोजी रामनवमीच्या दिवशी श्रीक्षेत्र काशी येथे अद्वैताचा साक्षात्कार झाला व तेव्हापासून मोटांना मुक्तावस्था प्राप्त झाली.

अशा प्रकारे पूज्य श्री मोटा यांनी साध्या संसारी जीवनातून १५ वर्षात मुक्तावस्थेत प्रवेश केला. त्यांचे खरे गुरु जबलपूर जवळील साईखेड्याचे श्रीधुणीवाले दादाच होत. परंतु त्यांचे गुरु त्यांना सारखे म्हणत असत की मी साईबाबा आहे. मी ताजुद्दीन आहे. मी उपासनी महाराज आहे. मीच अक्कलकोट स्वामी आहे. त्यामुळे मोटा या सर्वांनाच ते सर्व एकच असल्याने गुरु म्हणूनच संबोधित असत. श्रीसाईबाबांबद्दल तर मोटा म्हणत की " HE gave final touches to my spiritual progress " " श्रीसाईबाबांनी माझ्या साधनेला अंतीम स्वरूप दिले. "

साधनेच्या काळात मोटा शिरडीसपण एक महिना राहून आले होते. शिरडीत ते समाधि मंदीराच्या समोर माडीवर राहिले होते व अब्दुल बाबांनाही भेटले होते. त्यांना पाहिल्यावर अब्दुल बाबांनी " अरे ! हा तर आपल्यातलाच माणूस आहे " या शब्दानी स्वागत केले होते.

मुक्तावस्था प्राप्त झाल्यानंतर मोटांनी आपला काळ सर्वस्वी धर्माची जागृति करण्यात व समाज कल्याणप्रवृत्तीत घालविला. त्यांनी भारतात ३ ठिकाणी पवित्र नद्यांच्या काठी हरिःॐ आश्रमांची स्थापना केली व साधकांसाठी मौन मंदीरांची सोय केली. त्यांचा आपल्या भक्तांशी इतका तादात्म्य भाव झाला होता की एकाच वेळी त्यांचे शरीरात भक्तांचे कितीतरी रोग एकत्र झालेले असत उदा• पाठीच्या कण्याचा रोग, मूत्रपिंडाचा आजार, अनिद्रा, मूळव्याध, मधुमेह, दमा वगैरे वगैरे तरीही ते नेहमी हसत आनंदात असत.

१९६२ नंतर त्यांनी कोट्यावधि रुपये गोळा केले व सर्व जनतेच्या शैक्षणिक, शारीरिक व नैतिक उन्नतीच्या चळवळीसाठी खर्च केले. शेवटी १९७६ साली गुजरातेतील मही नदीच्या काठी आपल्या काही खास भक्ताना आधी सुचना देऊन जेव्हा त्यांनी देहत्याग केला तेव्हा त्यांनी स्वतः जवळ एक पैसादेखील ठेवला नव्हता. एवढेच काय त्यांनी वरील आपल्या निकटवर्ती भक्ताना ताकीद दिली होती की कुणी त्यांचे वीटामातीचे स्मारक बांधू नये काही पैसा गोळा झालाच तर तो समाजाच्या उन्नतीसाठीच खर्च करावा.

अशा थोर संताला माझे शतशः प्रणाम !!

★ ★ ★

# नामाचा महिमा आणि साईबाबा

डॉ. रा. सी. कापडी, कोल्हापूर,

ये त्वक्षरमनिर्देशमव्यक्तं पर्युपासते ।

सर्वत्रगम चिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम ॥

● भगवत्-गीतेत बाराव्या अध्यायात ईश्वराचे वरीलप्रमाणे वर्णन केलेले आहे. मुळात ईश्वर अनामिक, अनिर्वाच्य, अव्यक्त, सर्वव्यापी, अचिंत्य, अविकारी, अचल, नित्य असा निर्गुण ब्रम्हांत आहे.

उपनिषदात 'अहं ब्रम्हास्मी' सर्व खलु इदं ब्रम्हं 'सो ऽऽ हं या महावाक्याने परमेश्वर आणि आत्मा एकच आहे असे दाखविले आहे.

'ॐ प्रवण हे एकाक्षर ब्रम्ह वेदांत स्फुरले आहे. हे ईश्वराचे परम स्वरुप आहे. 'ओमित्येकाक्षरं ब्रम्ह' ज्ञानेश्वर माऊली म्हणते 'म्हणोनि प्रणवेक नाम । हे एकाक्षर ब्रम्ह । जे माझे स्वरुप परम । नाम जप यज्ञ तो परम । बाधू न शके स्नानादि कर्म ।

नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रम्ह वेदार्थ ।

भावार्थ : नाम जप, यज्ञ हा श्रेष्ठ असून, स्नानादिक नित्य कर्मामध्ये तो व्यत्यय आणू शकत नाहीं. धर्माधर्म ज्याच्या योगे पवित्र होतात व वेदात ज्याला परब्रम्ह म्हटले आहे तो जपयज्ञ माझी विभूती आहे.

'ॐतत् सत्' असे ब्रम्हाचे त्रिविध नाम आहे. या तीन नावाने ब्राम्हण वेद व यज्ञ हे उत्पन्न झाले.

जाई अनादि परब्रम्ह । जे जगदादी विश्रामधाम । तयाचे एकनाम ।
त्रिधा पे असे ।

वरील सर्व उताऱ्यावरून परमेश्वराला नाव नाही. तो अनामिक आहे असे दिसून येते. भगवत् गीतेतही नामाचा उच्चार नाही. परंतु गीतेंतील ११ व्या अध्यायातील शेवटच्या श्लोकात—मत्कर्म मत्कर्म कृन्मतपरमो मद्भक्तः सगवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥

जो सर्व कर्में माझी म्हणजे परमेश्वराची या बुद्धिने कर्म करतो, मत्परायण होतो, माझी भक्ति करतो—वगैरे मत्पर, मत्परायची हे शब्द कोणाला लागू आहेत?

अर्थात ईश्वराला म्हणजेच श्रीकृष्णाला । कारण श्रीकृष्णाने युद्धाच्या ऐन धुमाळीत जेव्हा अर्जुनाला मोह झाला तेव्हा त्याला आप्त म्हणून नव्हे तर शिष्य समजून उपदेश केला आणि तो सर्व जगताला सखा म्हणजे येथे गुरु व शिष्याचे नाते आले. गुरुशिवाय साधकाला मोक्ष नाही. त्या गुरुची भेट व्हायला साधकाला आपली अध्यात्मक मार्गाने तयारी करायला पाहिजे परंतु ही तयारी नामघोषाशिवाय कशी होणार ? यावरही भगवत् गीतेत तोडगा आहे. तो असाः—

संनियम्येन्द्रिय ग्राम सर्वत्र समबुद्धयः । ते प्राप्नुवन्ति मामेष सर्वभूतंहिते रताः॥

सर्व इंद्रियांचे संयमन करून, सर्वत्र समबुद्धि ठेवून, सर्व प्राणीमात्रांचे हित करण्याविषयी तत्पर होऊन निर्गुण ब्रम्हाची उपासना करतात ते मला प्राप्त होतात.

हे विश्वचि माझे घर । ऐसि मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ॥

वरील ज्ञानदेव माऊलींच्या शब्दात हेच सांगितले आहे. वरील प्रमाणे निर्गुण ब्रम्हाची पूजा करायला नामाची जरूरी आहेच.

उपजलिया बाळकाशी । नाव नाही तयापाशी ठेविलानी नावेशीं 'ओ' देत उठी । मुलाला जन्मता काही नाव नसते. नंतर त्याला जे नाव द्यावे त्या नावाने हाक मारिली असता 'ओ' देते. म्हणून जपजाप्य, ध्यान, पूजा करताना नामे पाहिजेत, मन व इंद्रिये विषयातून काढल्याशिवाय नामस्मरण शक्य नाही. नामाव्यतिरिक्त जीवाच्या सर्व कल्पना मी माझे या विषयीच असतात. नामस्मरणाने कल्पनेचा प्रवाह बदलता येतो. समर्थ रामदास स्वामी म्हणतात.

स्फुरे विषयी कल्पना ते अविद्या । स्फुरे ब्रम्ह रे जाण माया सुविद्या । मुळी कल्पना दो रुपे तेचि जाली । विवेके तरी स्वस्वरुपी मिळाली ।। नामस्मरण म्हणजे स्वरुपाची कल्पना । त्या साधनेने साधक स्वरुपी मिळतो. नामस्मरणाचे महत्व मुक्त-कंठाने सर्व संतानी गायले आहे. संत म्हणतात मन सदोदित ईश्वरात ठेवा. मन ईश्वरात ठेवणे म्हणजे नामस्मरण करणे होय. मग ते नाव कोठलेही असो. ॐ, सोऽऽहं. रामकृष्ण हरी, अल्ला, जिजस खाईस्ट, बुद्ध, वीरशैव, बसवेश्वर, बाहुबली साईबाबा, कोणतेही चालेल. मात्र त्या नामावर श्रद्धा पाहिजे. मन हे ओढाळ आहे. ध्यान करताना पूजा-अर्चा करताना, नामस्मरण घेताना हे चंचल मन भरकटत आपणास जग फिरवून आणते. विषयाकडे नेते परंतु त्या मनाचाही एक चांगला गुण आहे. कां जे यया मनाचे एक निके । जे देखीले गोडीचिया ठाया सोके । म्हणोनि अनुभव-सुखचि कवतिके । दावीत जाईजे ॥

मनाची एक चांगली बाजू आहे. त्याला जशी सवय लावावी तशी त्याची ओढ असते म्हणून आत्मोद्धाराकडे जर मन लावले तर आत्मसुखात कसे विश्व भरले आहे त्याचा अनुभव येईल, परंतु हे एकाएकी घडणार नाही. त्याला हळूहळू त्या परमधाम सुखाची चटक लावायला पाहिजे.

। पुनेवहुनि जैसे । शशीबिंब दिसे दिसे । हारपत अंवसे नाही चि होय । तैसे भोगा आंतुनि निवतां । चित्त मनमाजी रमना । हळूं हळुं पंडु सुता । मीचि होईल ॥

अथ चित्तसमाधातु न शक्नोषि मयी स्थिरमा ।

अभ्यास योगेन ततो मामिच्छातुं धनंजय ॥

यावर ज्ञानेश्वर माऊली भाष्य करतात म्हणोनि अभ्यासासी काही । सर्वथा दुष्कर नाही । या लागी माझ्या ठायी अभ्यासे मीळ ॥ माझेनि अनुसंधाने देख । संकल्पु जाळणे निःशेख । मद्याजी चोख, ऐसा मियां आथिला होसी । तेथ माझियाची स्वरूपा पावसी । हे अंतःकरणीच तुजपाशी । बोलिजत असे ॥ कोणतेही सद्गुरु अघात्मविध्येने साक्षात्कार करून घेणाऱ्या सत्‌शिष्याला असेच सांगतात. नामस्मरण करू लागले म्हणजे हळूहळू ईश्वर साक्षात्काराचे सुख होऊ लागते. जाणीवेची अवस्था येते. म्हणजेच ईश्वराची ब्रम्हत्वाची अवस्था आनंदमय अवस्था । अखंड अनुसंधान साधून नामस्मरण केले असता व एकाग्र चित्तांने हे ध्यान साधले म्हणजे सुगंध ज्योति । अनाहत नाद (म्हणजे दोन वस्तुच्या संघर्षाने येणाऱ्या आवाजाशिवाय येणारा परमात्मरुपी नाद) अमृत रस हंसाचानाच हे अतींद्रिय आत्मानुभव साधकाला येतात. हे अनुभव म्हणजे विठ्ठल मंदीरावर फडकणाऱ्या भगव्या निशाणाच्या लांबून दिसणाऱ्या खुणेची जाणीव होय । ह्या खुणेशी अनुसंधान बांधले पाहिजे.

योगसुखाचे सोहाळे । सेवका तुझे नि स्नेहाळे ।

सोहं सिद्धीच लळे । पाळिशी तूं ॥

प्रत्यक ज्योतीची ओवाळणी । करिशी मन पवनाची खेळणी ।

आत्मसुखाची बाळ लेणी । लेवविसी सत्राविचे स्तनदेशी । अनाहताचा हलरु गासी । समाधी बोधे निवविशी । बुझार्सन ॥

ज्ञानदेव माऊलीने प्रातिभ–आत्मसुखाचे अनुभव वरील वाक्यात सुंदर अलंकारी भाषेत गाइले आहेत. हे अनुभव म्हणजे योग सुखाचे सोहाळे, आत्मसुखाची बाळलेणी प्रत्येक ज्योतीची ओवाळणी, अनाहताचे अंगाई गीत, सत्रावीचे स्तन्य होत. याची परिणती समाधिसुखात अहंब्रम्हास्मि या ब्रम्हत्व पावत्याच्या अनुभवात येते.

अखंड नामस्मरणाचा टाहो फोडून समाधीसुखात भक्त कसा विलीन होतो हे वरील लिखाणात मुळारंभापासून आले आहे. याच विश्लेषणाचा आधार घेऊन परमपूज्य शिर्डीचे श्रीसाईबाबा यांच्या चरित्राचे अवगाहन केले असता, बाबासुद्धा श्रीकृष्ण परमात्माप्रमाणे श्रेष्ठ अवतारी पुरुष कसे होते हे दाखविता येईल. मुळारंभी ब्रम्हाला परमात्म्याला नाव नाही. एखादा जीव ज्या कुळीत जन्म घेतो ती कुळी त्याला सोईचे नाव देते. श्रीसाईबाबा कोठे जन्मले, कोणत्या कुळी जन्मले हे स्वतः त्यांनी आमरात गुलदस्तात ठेविले. त्यांच्याबद्दल दक्षीण भारताच्या वर्तमानपत्रात जी माहिती प्रसिद्ध आहे त्यावरून एका थोर ईश्वरनिष्ठ ब्राम्हण कुळात हिंदुकुळात त्यांचा जन्म झाला व याला दुजोरा साईचरित्रात त्यांचे कान टोचले होते यावरून मिळतो. । अविंध म्हणता विंधति कान। हिंदु म्हणता सुना प्रमाण । म्हणजे जन्म हिंदु कुळात व संगोपन मुस्लीम कुळात झाले असावे.

श्रीकृष्णाप्रमाणे साईबाबांनी अद्भूत कृत्ये लहानपणापासून केली. पणत्यात पाणी घालून पणत्या तेवत ठेवण्याची कला त्यांना लहानपणापासून होती. खेळात शंकराची पिंडी वाळूची किंवा मातीची बनवून त्याची पूजाअर्चा करून पणत्याची निरांजने करून आरती करीत होते.

खेळातील संवगड्याबरोबर गोट्याचा खेळ खेळत असता एकदा सवंगड्याच्या सर्व गोटया जिंकून घेतल्या. देव्हाऱ्यातील नर्मदा नदीतील आणलेला गुळगुळीत बाण जो पूजेला लावलेला होता तो सुद्धा सवंगड्याला आणायला सांगून जिंकून घेतला व तोंडात टाकून गिळला. त्या सवंगडयाच्या मातेला जेव्हा ही हकिगत कळली तेव्हा तिने रागाने साईला तोंड उघडण्यास सांगितले. श्रीकृष्णाने जसे यशोदामाईला तोंड उघडून बाळपणीच ईश्वरीरुप दाखविले त्याप्रमाणे सवंगडयाच्या मातेला आपले तोंड उघडून ईश्वरीरूप दाखविले. ती बिचारी दिङ्मूढ झाली. प्रेमाने मिठी मारली. साईचे चरण प्रेमाश्रूने प्रक्षाळिले. तिला साई हे साक्षात् परमेश्वर आहेत याची खात्री पटली. बाबा हे मुळापासून अनामिक होते. त्यांना शिर्डीच्या पहिल्याच भेटीत एका भक्ताने म्हाळसापतीने 'या साई' असे संबोधले. तेव्हापासून पडलेले हेच नाव बाबांनी कायम घेतले. एका कोर्टाच्या खटल्यात त्यांची साक्ष काढण्यात आली तेव्हा त्यांनी आपले नाव 'साईबाबा' हेच सांगितले.

साईबाबा हे परमेश्वरी अवतार होते यात काही शंका नाही. परमेश्वरी अवताराप्रमाणे त्यांनी अनेक अद्भूत चमत्कार केले. एकाचवेळी अनेक देह धारण केले. शिर्डी न सोडता भक्तांच्या आमंत्रणावरून त्यांच्या घरी वेष बदलून द्वीज पंक्तीत

यथेच्छ भोजन करून, ढेकर देऊन, शे-दोनशे ब्राम्हणा बरोबर दक्षिणा घेऊन आले. कित्येक प्रकांड पंडीतांच्या मनातील विचार अगोदरच सांगून त्यांना मस्तक लवविण्यास लावले. विनोद प्रचूर घटना मुद्दाम घडवून आणून कित्येक भक्तांना बोधामृत पाजले. शेकडो भक्तांच्या प्रापंचिक अडचणी नुसत्या आशिर्वादाने नाहीशा केल्या. निपुत्रिकाना संतती दिली. ज्यांनी पारमार्थिक साधनेसाठी बाबांच्या चरणी वाहून घेतले. त्यांना सगुण निर्गुण भक्तीचे मार्ग दाखविले. कोणाला मच्छिंद्रगडावर एकांतवासात तपः साधना करावयास पाठविले. कोणाला नारदीय कीर्तन रंगात रंगविणे कोणाला गीता रहस्य, एकनाथी, भागवत, रामायण, विष्णुसहस्त्रनाम वगैरे पोथ्यांच्या पारायणात रम-माण होण्यास लावले. अनेक भक्तांना-साधकाना नामस्मरण करावयास बसवून, आत्म-साक्षात्काराची गुरुकिल्ली दिली. बाबांना समवयस्क असे अनेक सत्पुरुष बाबांच्यावेळी होऊन गेले. गजानन महाराज, अक्कलकोट महाराज, माणिक प्रभू, ब्रम्हचैतन्य महा-राच, सिद्धरुढ, वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे महाराज वगैरे बरेच साक्षात्कारी विभूती महाराष्ट्रात ठिकठिकाणी त्या वेळी विखुरलेल्या होत्या. त्यांच्या कार्यपद्धतीत व व स्वभावधर्मात जरी एकवाक्यता नव्हती, तरी ते एकमेकाला ईश्वर विभूती म्हणून मानीत असत. त्यांच्यात बिनतारेचे संदेश चालत असत. असे काही घडलेल्या घटना वरून दिसून येते. एकदा टेंबे स्वामी यांनी साईबाबांकडे येणाऱ्या भक्ताबवळ नारळाची भेट दिली आणि आपला नमस्कार सांगिताना उद्गार काढले. 'आम्ही संन्याशी। कोणाला नमस्कार करीत नाहीत, परंतु श्रीसाईबाबांना आम्ही श्रेष्ठ बंधु म्हणून मानतो. काहीवेळा अपवाद करावा लागतो.

यावरुन त्यावेळी बाबा संतमुकुटमणी होते असे वाटते. संत विभूतींत श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव करू नये ही गोष्ट खरी, तरी पण आमच्यामते बाबा श्रेष्ठ ईश्वरी अवतार होते.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥

भावार्थ ज्या ज्या वेळी अधर्म माजतो त्या त्या वेळो मी अवतार होतो.

श्रीकृष्णाचा अवतार :—

परित्राणाय साधूंना विनाशायाच दुष्कृताम।
धर्म संस्थापनार्थय संभवामि युगेयुगे॥

भावार्थ : साधूचे संरक्षण करण्यासाठी, दुष्टांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी मी युगेयुगे जन्म जन्म घेतो॥ राम, कृष्ण यांचा दुसऱ्या श्लोकाच्या भावार्थाच्या अनुसंधाने अवतार होता. तर साईबाबांचा जन्म

पहिल्या श्लोकाच्या पुष्ट्यर्थ दिसतो. हिंदु मुस्लीम बांधवांमध्ये भयंकर तेढ माजली होती. ती शमन करण्याकरता बाबांनी धड मुस्लीम नाही धड हिंदु नाही अशी भूमिका घेतली होती. धर्मपंथात ऐक्य साधावे म्हणून त्यांनी धर्मातीत देव Secular God किंवा Cosmopolition God असा अवतार घेतला होता. वेष यवनी पण भक्तांच्या आचारविचारात हिंदुधर्माचे प्राबल्य जपजाप्य होमहवन, अग्नीपूजा, आरती-कीर्तन प्रवचन याबरोबर कुराणाच्या पठणालाही पूर्ण मुभा होती, आणि बाबांनी शेवटपर्यंत 'अल्ला मालीक' हेच पालुपद शेवटपर्यंत चालू ठेविले असल्यामुळे धर्मातीत देव हेच नाव त्याना सार्थ दिसते. तिन्ही त्रिकाळ बाबांच्या मूर्तीची पूजा अर्चा चालू असली तरी समाधीवर मुस्लीम धर्माप्रमाणे 'गलोल' ही पाखरले जातात. असा हा शिर्डीचा देव नामातित आहे. इतर धर्मीयाना मंदीराचे दरवाजे सताड उघडे असल्यामुळे या देवाची महती दिवसे दिवस वाढत आहे. भारतभर चारीदिशी नवीन मंदीरे उघडत आहेत. हा देव सर्वधर्मियाच्या नवसाला पावतो. कारण तो म्हणतो-माझ्या समाधीची पायरी चढेल ।दुःख हे हरेल सर्व त्याचे । नित्य मीजिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥


**श्री साईभक्तांना सुवर्ण संधी**

**श्री साईलीला मासिकाचे १९६४ ते १९८०**

**मुदतीतील**

**दुर्मिळ अंक उपलब्ध आहेत.**

**शिर्डी कार्यालयाकडे चौकशी करा**

# नवसास पावणारा " दर्या हनुमान "

—श्री. ग. गो. सामंत, एम. ए.
निवासी व्यवस्थापक
श्री महालक्ष्मी मंदिर, मुंबई.

● सर्वांस मुंबईची " श्री महालक्ष्मी " परिचीत आहेच. अरबी समुद्राच्या पार्श्वभूमीवर उंचावर असलेले श्री महालक्ष्मी मंदिर हे प्रत्येक हिंदूचे अभिमानाचे स्थान आहे. श्री महालक्ष्मीचे दर्शन घेऊन समुद्राकडे जाण्यासाठी पायऱ्या आहेत व खाली उतरताना उजवीकडे श्री महालक्ष्मी चॅरिटीजचे श्री गणपती मंदिर व डावीकडे श्री हनुमान मंदिर ( दर्या हनुमान ) लागते.

ही दोन्ही मंदिरे श्री महालक्ष्मी चॅरिटीजची आहेत ही गोष्ट फारच थोड्या भाविकांस माहित आहे. या दोन्ही देवळांस इतिहास आहे व तो सर्व भाविकास ज्ञात व्हावा म्हणून ' दर्या हनुमान 'ची माहिती द्यावी लागत आहे.

" दर्या हनुमान " श्री महालक्ष्मी प्रमाणेच पुरातन आहे. जणू काय श्री महालक्ष्मीच्या संरक्षणासाठी तो समुद्र थोपवून उभा आहे असे वाटते. समुद्रावर सेतू बांधून श्रीरामाला लंकेत नेणारा हनुमान हे एक श्रद्धेचं प्रतिक आहे. हा हनुमान चिरंजीव आहे. असा हा चिरंजीव हनुमान ' दर्या हनुमान ' म्हणून महालक्ष्मीला समुद्राकडे पाठ करून उभा आहे.

महालक्ष्मीला लक्ष्मीचा वास असावा. महालक्ष्मी रेसकोर्सवर जी पैशाची उलाढाल होते त्याला सीमा नाही. रंकाचा राव व रावाचा रंक करण्याची किमया या महालक्ष्मी रेसकोर्सवर आहे. अशाच एका जीवनाचा जुगार खेळणाऱ्या भक्ताची ही कथा आहे. या हनुमान भक्ताने आपल्याकडे जी काय अपुरी पुंजी होती ती 'दर्या हनुमानाला' साक्षी ठेऊन, नवस करून जुगारात लावली. अर्धपोटी जगण्यापेक्षा उपवासाने मरणे बरे असे वाटून सर्वस्व या भक्ताने पणाला लावले. फायदा झाला व जे काय मिळेल ते शिल्लक न ठेवता परत जुगारात लावायचे. गेले तरी बेहत्तर. लाखो रुपये मिळावे अशी पेडगावच्या शहाण्याप्रमाणे त्याची कथा झाली. शेवटी—

देणाऱ्याचे हात हजार । दुबळी माझी झोळी—

असे म्हणण्याची त्याची पाळी आली. ' दर्या हनुमान'ने आपल्या जीवंतपणाची

साक्ष दिली. रंकाचा राव झाला. समुद्राला थोपवून धरणाऱ्या या 'दर्या हनुमानास' या भक्ताने मंदिर उभे केले. अगणित खर्च केला, व आज अनेक वर्षे हा भक्त आपल्या नातलगासमवेत दर मंगळवारी 'दर्या हनुमानाची' पूजा करतो. परमेश्वरास तो विसरला नाही. आज हा भक्त वैभवाच्या शिखरावर आहे. त्याच्या श्रद्धा आणि सबुरीचे फळ त्याला मिळाले—मिळत आहे.

काही कारणास्तव या भक्ताचे नाव देता येत नाही. हा भक्तदेखील मौनच धारण करतो. दर मंगळवारी प्रेमाने, श्रद्धेने, 'दर्या हनुमानाची' पूजा, आरती व नैवेद्य तो न विसरता करतो. गाजावाजा नाही—प्रसिध्दी नाही. फक्त ओथंबून जाणारी श्रद्धाच प्रत्येकाला दिसून येईल.

मुंबईत व बाहेरगावी नवसास पावणारे गणपती आहेत. मुलांसाठी फडके गणपती, लग्नासाठी प्रभादेवीचा सिध्दीविनायक त्याचप्रमाणे हा 'दर्या हनुमान' नवसास पावणारा आहे.

---


" His life story Was a mission Divine
It's worth while to wait a while !
No other book On Sai Baba's life
Anywhere near to this novel

# "A MISSION DIVINE!"

Hundreds of letters in appreciation of its original Marathi novel "मशिदीत प्रगटला परमेश्वर !"

Five hundred pages of devotion, Spiritual exposition and Divine miracles those take you in o a trance and tranquility of mind ! Experience it !

Publishing on the auspicious day of Dassera, 19th oct. 1980. Price Rs. 45/— Postage Rs. 4/— Vcry limited copies :

PRASHANTI Prakashan, 5, Vasant Apartments Plot 47, Kastur Park, Shimpoli Road, Borivali ( West ), Bombay 400092

# परात्पर गुरू

—कु. सुलोचना गुरू गोदावरी
श्रीउपासनी बाबा आश्रम
साकोरी जि. नगर

● सत्, चित्, आनंद अविनाशी, सर्व व्यापक परमात्मा, भक्तवत्सल, भक्तांसाठी अंशरूपाने पृथ्वीवर अवतार घेतो, त्यावेळेस अज्ञानीजनाना त्याची जाणीव देखील नसते. रात्री पृथ्वीच्या छायेत, सूर्यकिरणे दिसत नाहीत. त्याच पृथ्वीचे आवरण बाजूला होवू लागताच प्रथम संधीप्रकाश दिसतो. नंतर एक एक करून त्याची किरणे अनंत अशा आकाशात विखरू लागतात आणि मग हळू, हळू तो पूर्ण सूर्य दृष्टीगोचर होतो. त्याप्रमाणे हे संत, सत्पुरुष आपल्यावर मायेची भुरळ घालून गुप्त राहण्याचा प्रयत्न करतात परंतु या मायारूपी ढगांनी ते थोडेच आच्छादित राहणार का? भावरूपी पवनाने ते दूर सरकतात व त्यांच्या पूर्णत्वाची चाहूल, पूर्व सुकृताने हळूच एखाद्या साधकाला लागते. आपसात त्याची चर्चा होवू लागते. चार लोक एकत्र येतात, जमतात. असे करता करता भाविकतेने हळू, हळू जनसमूह त्यांच्याकडे आकृष्ट होतो.

श्रीकृष्णभगवंताच्या वेणू नादाने यद्वत गायी, व्याघ्र एके ठिकाणी येत आणि ब्रह्मानंदात तल्लीन होत. तद्वत जातीभेद विसरून सर्वच मानव या साई अवलियाकडे येवून, सुख-दुःखातून मुक्त होवून, भक्ति-प्रेमात अवगाहन करून आनंद लुटतात. जो, तो आपल्या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे पहात असतो. ऐहिक सुख इच्छिणारे, त्या सुखाप्रत प्राप्त होतात. आध्यात्मिक सुख इच्छिणारे, त्या सुखाप्रत प्राप्त होतात.

आमचे कै. आई-वडील सौ. काशीबाई आणि श्री. यशवंतराव बोरावके यांनी श्रीसाईनाथांच्या लीला प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. 'घोडी इरवली' आपली पोटातील आतडी बाहेर काढून धुवत होते.' वगैरे गोष्टी त्यांच्या तोंडून आम्ही लहानपणी ऐकत होतो. त्यावेळेस शिर्डीलाच शेती होती. त्याच सुमारास, श्री. काशीनाथ उपासनी शिर्डीस आले. त्यांची बहुतेक साधना पूर्ण झालीच होती व थोडीशी श्रीसाईंना पुरी करवून घ्यायची होती. त्याकरता त्यांनी खंडोबाच्या पडक्या, विंचू सर्प असलेल्या देवळात त्यांना राहण्यास सांगितले. तेव्हा उपासनी आमच्या दादांकडे (यशवंतराव) वस्तीवर जात, त्यांच्याकडे गप्पा करीत, जेवत, आईला मदत करीत असत व इकडे श्री. खापर्डे यांच्याकडे पंचदशी श्रीसाईच्या सांगण्यावरून शिकत असत. अशा तऱ्हेने घरी जावू देण्याचे नाव काढू देत नसत. असे एक एक प्रयोग चालू असता,

यांची आध्यात्मिक साधना पूर्ण झालेली जाणून, आपल्याला खरा शिष्य भेटला या आनंदाने त्या परम सद्गुरूंनी पुढील उद्गार काढले—

"अरे! माझे सर्वस्व मी तुला दिले आहे. हे मी तुला ताम्रपत्रावर नव्हे तर सुवर्ण पत्रावर लिहून देतो" अशा तऱ्हेने हिऱ्याला पैलू पाडून त्यांनी प्रकाशीत केले. त्यांची किर्ती सर्वत्र पसरली अशा वेळेस श्रीसाई नाथांनी समाधी घेतल्या नंतर श्रीनरसिंह स्वामी श्री उपासनी महाराजांकडे आले आणि विनंती पूर्वक म्हणाले की 'आपलें प्रचार कार्य करण्याची मनीषा आहे.' तेव्हा श्रीबाबांनी (उपासनी) सांगितले की 'तू माझ्या ऐवजी माझ्या सद्गुरुंचे प्रचार कार्य कर' हे प्रत्यक्ष ऐकलेल्या लोकांच्या तोंडून आम्ही ऐकले आहे. तेव्हा पासून ते जीवनाच्या अंता पर्यंत त्यांनी हे कार्य करून श्रीसाईनाथ रूपच झाले. आणि त्यांचा कीर्तिध्वज अखिल विश्वात फडकवला.

श्रीउपासनी महाराजांनी आपल्या सद्गुरुंच्या कार्यास वेगळीच कलाटनी दिली पूर्वीच्या मैत्रेयी, गार्गी आदी ऋषीभार्या वेदांच्या ऋचांची रचना करून ऋषींसह यज्ञ करीत असत त्याप्रमाणे उपासने सह त्यांनी स्त्रियांनी वैदिक संस्कृतीचे शिक्षण देवून, यज्ञ संस्था स्थापन करून, स्त्रियांच्या बाबतीत मोठीच क्रांती घडवून आणली. त्याकरता त्यांना भयंकर लोकापवादही सहन करावेच लागले.

मूर्तिमंत सद्गुरु सेवाच श्री गोदावरी माऊलीचे रूप धारण करून त्यांच्याकडे आली आणि आपल्या सद्गुरुंच्या कार्यात आणिक भर घालून आध्यात्मिक समृद्धी वाढली आहे. तसेच जनता जनार्दनाच्या सेवेचा भागही तीने त्याला जोडला आहे. प्रसंगाने गरीबांना अन्नदान वस्त्रदान व इतर मदतीचा भाग समाविष्ट केला आहे.

# माझी कनवाळू साईमाऊली

— के. एस. वि. गोवा,

**शरण मज आला आणि वाया गेला**

**दाखवा दाखवा ऐसा कोणी ! ! !**

हे बाबांचे अमोघ बोल भक्तांना प्रत्ययास आल्याशिवाय कदापी राहणार नाहीत. जर साईचरणाशी अनन्य भावाने शरण आलात तर बाबा आपल्या भक्ताला कदापी सहारा दिल्याशिवाय, संकटातून वाचविल्याशिवाय राहणार नाहीत. भक्ताची प्रार्थना कदापी वाया जाणार नाही. साईसमर्थ म्हणजे प्रत्यक्ष कारुण्याची मूर्ती. आजकाल कलीयुगात साईनाथ महान जागृत दैवत आहे. बाबांनी दिलेल्या वचनाप्रमाणे खरोखरच घडत असते. आपला भाव साईचरणाशी दृढ ठेवल्यास चमत्कार अनुभवयास मिळतो. याप्रमाणे माझ्या जीवनात आलेला अनुभव देत आहे.

एके दिवशी अचानक माझ्या उजव्या डोळयात धुळीचा कण गेला. झाले. तेच निमित्त त्या दिवसापासून डोळयाला जरा त्रास होऊ लागला. दुसऱ्या दिवशी मी फॅमीली डॉक्टराना दाखविले. त्यांनी तपासून सांगितले की डोळयाला इन्फेक्शन झाले आहे. तेव्हा स्पेशलीस्ट नेत्र डॉ. ना दाखवा. त्याप्रमाणे माझ्या वडिलांनी मला दुसऱ्या दिवशी नेत्र सर्जनना दाखविले. त्यांनी माझ्या डोळयाची नीट तपासणी करून औषधोपचार सुरू केले. तरी काही गुण आला नाही. दिवसे दिवस डोळयांचा त्रास असह्य होऊ लागला. वेदना वाढतच जाऊ लागल्या. डॉक्टरकडे अनेक खेपा मारल्या. नंतर डॉ. ने सांगितले की एका महिन्यात डोळा बरा होणार. झाले. एक महिना झाला. दोन झाले. तरी काही डोळा बरा होण्याचे चिन्ह दिसेना. दिवस वाढतच जाऊ लागले. मी फार बेचैन होऊन गेलो. मला काहीच सुचेनासे झाले. बरेच दिवस इलाज करूनही व्यर्थ.

माझी बहीण मला नेहमी डोळयाला उदी लावण्यास सांगते, त्याप्रमाणे मी नित्य साईसमर्थांची उदी लावतो. आमच्या सगळया कुटुंबीय मंडळींची श्रीसाईसमर्थांवर पूर्ण श्रद्धा आहे. श्रीचरणी आमची ओढ वाढतच आहे.

आणि एके दिवशी श्रीसाईनाथांनीच मला बुध्दी दिली म्हणायची. अतिशय बेचैनी वाढल्यावर मी माझ्या सामर्थ्यशाली डॉ० ( बाबांच्या ) चरणाशी धाव घेतली. श्रींची आर्त स्वराने अश्रुपूर्ण नयनानी करुणा भाकली. बाबांचा धावा सारखा चालू

केला. आणखी काय चमत्कार ! शेवटी खरोखरच श्रीसाईंना माझी दया आली. बाबांनी माझ्या हाकेला धाव घेतली. ज्या दिवशी मी साईंचा धावा केला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी अचानक माझी थोरली विवाहीत बहीण आमच्या घरी आली. तिने माझ्या डोळयाची स्थिती जाणली. लवकरच तिने मला आपल्या घरी नेऊन तावडतोब चांगल्या नेत्र सर्जनना स्पेशालीस्ट डॉ० ना दाखविले. त्यांनी माझ्या डोळ्याची नीट तपासणी करून औषधोपचार केले.

खरोखरच आनंदाची गोष्ट म्हणजे श्रीसाईसमर्थांच्या कृपेने माझा डोळा तीन दिवसातच पूर्ण चांगला झाला. खरंच श्रींचा महिमा कोणत्या शब्दाने वर्णू हेच कळत नाही. मी श्रींचे उपकार जन्मो जन्मी फेडू शकत नाही. अशी त्यांची अगाध लीला आहे झाले.

ह्याच डोळयाच्या विकारामुळे मी श्रीसाईनाथांना नवस केला होता की जर माझा डोळा पूर्ण बरा झाला तर मी माझा अनुभव साईलीला मासिकात प्रसिद्ध करीन.

दुसरे म्हणजे ह्याच कारणामुळे मी बाबांना साई-सच्चरिताचे पारायण करण्याचा नवस केला होता. त्यानंतर मी नवरात्रात पारायण केले. आणखी काय चमत्कार वर्णू ! ज्या दिवशी मी पोथीची सांगता केली. त्याच्या दुसऱ्या दिवशी माझ्या वडिलांनी अचानक शिर्डीस जाण्याचा बेत केला, आम्ही सर्व मिळून शिर्डीला गेलो. बाबांनी आम्हाला लवकरच आपल्या दर्शनाला नेले. बाबांच्या दयेने एकंदर आमचा शिर्डीप्रवास एकदम सुखकर झाला. अशीच सदैव जन्मोजन्मी बाबांचे कृपा छत्र आम्हांवर असो.

॥ दयाघन साईमाऊलीला माझे कोटी कोटी प्रणाम ॥

# असे घडले शिरडी दर्शन

डॉ. सौ. मालतीबाई राहाटे
सामान्य रुग्णालय मु. पो. जि. भंडार

● रोज सकाळी साईबाबांपुढे नतमस्तक होऊन मी म्हणते, "बाबा, मला साहस, संयम, स्फूर्ती, सद्संग, सत्बुद्धी द्या." बाबा नेहमीच होकारार्थी मान हलवितात.

ता. ९ व १० फेब्रु. ८० ला साईलीला लेखक-कवि संमेलन होते. कार्यक्रमाला जाण्याचे ठरले. पण ऐन वेळी सुट्टी मिळणार नाही असे वरिष्ठाकडून कळले. त्यावेळी माझ्या मनाचा तोल सुटला. मी रडक्या स्वरात बाबांना म्हटले, "तुमची ईच्छा असेल व समाधी दर्शन घेण्याची माझी लायकी असेल तरच मला न्या. तुम्ही कराल ते मान्य."

आश्चर्य असे सायंकाळी माझी सुट्टी, मंजुर झाली. वाटेत काहीही त्रास न होता ता. ९ ला सकाळी ६ वाजता शिरडीला पोहोचले. कवि-लेखक संमेलनाचे कार्यक्रमाला गेले. साईलीला विशेषांकात माझी 'वंदना' कविता प्रसिद्ध झाली होती. फार सुंदर योग होता तो. नकळत माझे डोळे पाणावले. संमेलनाचा सुखसोहळा पाहिला. डोळे भरून शिरडी दर्शन घेतले. मन शांत झाले.

अनायासे पंढरपूरला जाण्याचा योग पण आला. शांतपणे विठ्ठल पाहिला. तुळजापूरला पण मी गेले. भवानी दर्शन झाले. शिरडी दर्शनाला गेले व पंढरपूर, तुळजापूर पण पाहिले. मी ओंजळभर मागीतले, बाबांनी झोळी भरून दिले. कृपा त्यांची !

✣ ✣ ✣

# दिव्य प्रचिती

—सौ. उषा अधिकारी,
सावित्री भुवन, बंदर रोड, रत्नागिरी

● घड्याळात १२॥ चा ठोका पडला आणि अशोकने चमकून वर पाहिले. आज ऑफिसमध्ये हजर व्हायला येणारा रघुवीर अजून आला नव्हता. विजया दशमीच्या उत्सवासाठी गेले ३।४ दिवस तो शिरडीस जाऊन राहिला होता. आज त्याने यायलाच पाहिजे होते. अशोकच्या कपाळावर एक सूक्ष्म आठी उठली. ओठ मुडपले. दाताने ओठ दाबीत त्याने पुन्हा घड्याळात पाहिले आणि फायलीत तोंड खुपसले इतक्यात अरे अशोक, ए अशोक अशा हाका मारीत प्रसन्न मुद्रेचा रघुवीर आत आला. अशोकच्या खांद्यावर स्नेहभराने हात ठेवीत तो म्हणाला, "मित्रा रागावलास ? पण काय सांगू तुला ! माझी ट्रिप इतकी मस्त झाली की काय सांगू आणि काय नको असे मला झाले आहे. हा बघ मी तुझ्यासाठी अंगारा, प्रसाद आणलाय आणि तीर्थंसुद्धा आणलंय भरून. घे." रघुवीरचा आपल्या खांद्यावरचा हात झुरळ झटकावा तसा झटकून अशोक म्हणाला, "मला नको तुझा अंगारा आणि प्रसाद. अरे, एका सेक्शनचा प्रमुख असलेल्या आणि सुशिक्षित असलेल्या तुझ्यासारख्या माणसाला ही बुवाबाजीच्या नादी लागण्याची खोड शोभत नाही सारखे आपली शिरडी शिरडी शिरडी, आज काय रामनवमी उद्या काय गुरुपौर्णिमा, परवा काय दसरा. प्रत्येक वेळी शिरडीची फेरी, आणि साहेब तरी असे की प्रत्येक वेळी तुला रजा देतात. मला बिलकूल पसंत नाही हे तुझे आणि त्यांचे वागणे. मी त्यांच्या जागी असतो तर तुला असे वारंवार रजेवर जाऊच दिले नसते. आपली जबाबदारी काय याची जाणीव तुला नसावी याचा मला खेद होतो. हा घे तुझा साईलीला अंक. काय एकेकाचे अनुभव. म्हणे उदी लावावी रोग बरा झाला. मंत्र जपला म्हैस सापडली. ऑपरेशनशिवाय रोग नुसत्या साईनामाने बरा झाला. अरे असे रोग बरे होत असते तर नाक्या नाक्यावर डॉक्टर लोकांच्या पाट्या कशाला दिसल्या असत्या ? आणि दवाखाने भरलेले कसे दिसले असते ? मला नवल वाटले की हे संपादक पण त्यात सामील. आपला अंक खपावा आणि साईबाबांचे नावांची कीर्ती वाढावी म्हणून येईल ते छापून टाकतात, आणि तुझ्यासारखे बावळट त्यावर विश्वास ठेऊन शिरडीला धावतात मला मुळीच पटत नाही हे. तुझे तीर्थ, अंगारा प्रसाद तुलाच लखलाभ होवो मला त्याची मुळीच गरज नाही. आणि

एक सांगतो हे शिरडीला धावणे बंद करून ऑफिस कामात रस घे-परीक्षा दे. आणखी मोठा ऑफिसर होशील." "झाले तुझे बोलून ? आता मला बोलू दे." असे म्हणून रघुवीर म्हणाला, " अशोक तुला पटत नसेल तर सोडून दे. पण श्रीबाबांना आणि संपादकाना कशाला नावे ठेवतोस ? अरे आपले नशीब उघडल्याशिवाय शिरडीचे दर्शनही होत नाही. मग कुठले उत्सव नी कुठले काय ? बाबांची इच्छा झाल्याशिवाय कुणालाही तिथे जाता येत नाही. माझे दैव खरेच थोर आहे आणि म्हणूनच मला जावेसे वाटले की साहेब मला रजा देतात आणि माझी यात्रा मोठ्या आनंदात पार पडते. तुला तीर्थ प्रसाद नको तर राहू दे. माझा लहानपणापासूनचा जिवलग मित्र म्हणून भयंकर गर्दीतल्या रांगेत उभा राहून हे तीर्थ मी मोठ्या मुष्किलीने मिळवले. असू दे. दुसऱ्या कोणाला तरी त्याचा उपयोग होईल. आपल्या ऑफिसात काय थोडे साईभक्त आहेत ? जातो मी ते माझी वाट पहात असतील.

रघुवीर खिन्न मनाने तेथून निघून गेला. आणि अशोकला स्वतःलाच काहीतरी खटकल्यासारखे वाटले आपण इतके वाक्-ताडन करावयाला नको होते. पण बोललेला शब्द आणि सुटलेला बाण थोडाच परत घेता येतो ? त्याने पुन्हा कामात डोके घातले. मात्र त्या दिवशी दोन्ही मित्र चहाला एकत्र आले नाहीत की संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर एकदम घराकडे वळले नाहीत. अशोक घुम्यासारखा बसून होता तर रघुवीर ऑफिसातल्या मित्रमंडळीना प्रसाद उदी वाटत होता. त्यांच्याजवळून घरी जाताना रघुवीरचे शब्द अशोकच्या कानावर आले. अरे माझा अशोक आज श्रीबाबांना नाव ठेवीत असला, प्रसाद अंगाऱ्याला नाक मुरडीत असला तरी बाबाच त्याला अशी प्रचिती आणून देतील की तो श्रीबाबांचा निस्सीम भक्त होईल आणि माझ्याही पुढे शिरडीला धाव मारील.

वरील बोल ऐकल्या न ऐकल्यासारखे करून अशोक घरी निघाला पण मानसीक ताणाने आज त्याचा चेहरा काळवंडला होता. आपण आपल्या जिवलग मित्राला कठोर शब्दांनी दुखविले असे त्याचे मन त्याला खात होते. अशा मनःस्थितीत तो घराशी येऊन पोचला पण रोजचे दृश्य आज तेथे नव्हते. यावेळी गॅलरीत आजीच्या शेजारी उभी राहून वाट पहाणारी २ वर्षांची बेबी तिथे नव्हती उलट शेजारपाजारची मंडळी जमून काहीतरी कुजबुजत होती. सर्वांचे चेहरे उतरलेले होते. त्याच्या पोटात धस्स् झाले कसाबसा जिना चढून तो वर गेला आणि पाहतो तो काय त्याची आई चिमुकल्या बेबीला मांडीवर घेऊन बसली होती. तिला रडे आवरत नव्हते. ऑफिसमधून आलेली त्याची पत्नी परत परत बेबीच्या अंगावर हात फिरवून आपल्या अश्रूंना वाट करून देत होती. त्यांचे फॅमिली डॉक्टर निराश मनाने बसून होते. त्याने

म्हाताऱ्या वडिलांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. घशाशी आलेला आवंढा गिळून त्यांनी डॉक्टरांकडे बोट दाखविले. डॉक्टर उठले आणि अशोकच्या पाठीवर थोपटत म्हणाले, अशोकराव बेबीला जबरदस्त फीट आली आहे. मी शक्य तेवढे प्रयत्न केले. करतोच आहे पण यश देणे ईश्वराच्या हाती. मानवी यत्न माझे हातून झाले आहेत पण जी विलक्षण सामर्थ्यवान शक्ती आहे तिची योजना मला कशी कळणार ? धीर धरा आणि खरं सांगू का तुमचा विश्वास असेल तर आता काही दैवी प्रयत्न करा. डॉक्टर असे म्हणाले तशी आजी पटकन् म्हणाल्या, "अरे अशोक तुझा देवावर विश्वास नाही पण मला वाटतं तू चटकन् जाऊन आपल्या रघूला घेऊन ये. आता तो शिर्डीहून आला असेल ना ? जा बाळ विश्वास नसला तरी बाबांचे नाव या अजाण अर्भकासाठी घे आणि पाय बाहेर टाक. रघू आल्याशिवाय राहणार नाही. आईची आज्ञा आणि गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन अशोक मुकाट्याने बाहेर पडणार तोच रघुवीर आत आला आणि म्हणाला, "काकू माझी आठवण काढलीत ना हा बघा मीच हजर झालो. हे काय काकू ? बेबीला काय झाले ? तुम्ही अशी रडता का ? डॉक्टर काय हो झाले बेबीला ?" उतावळया रघुवीरला डॉ. नी बेबीच्या दुखण्याचे थोडक्यात निदान सांगितले. क्षणाचाही विलंब न लावता तो बेबीजवळ गेला. आपल्या खिशातील पुडी काढून त्यातली उदी बेबीच्या कपाळाला लावली तिच्या अंगावरून फुंकून काढली. तीर्थाचे दोन थेंब तिच्या डोळ्यांना लावून तो म्हणाला। "बाबा मी आपली एकनिष्ठ भक्ती करीत असेन तर या लेकराला वाचवा. बिचारे अजाण अर्भक त्याने काय केले आहे ? माझ्यासाठी या वेड्या रघुसाठी, बेबीला पुन्हा माणसात आणा मी आपली वाटेल ती सेवा करीन रघुवीराच्या डोळयातून अश्रुंच्या धारा लागल्या होत्या तो हातातील उदी बेबीच्या अंगाला चोळीत होता. तोंडाने साईनामाचा अखंड जप करीत होता सर्व माणसे स्तब्ध राहून पहात होती आणि काय आश्चर्य बेबीने आपले डोळे उघडले. हातपाय हालविले सर्वांकडे चकीत नजरेने पाहिले आणि हाक मारली, "बाबा" अशोकचा आनंद गगनात मावेना तो धावत बेबीजवळ येऊन म्हणाला, 'बेब्या, तू शुद्धीवर आलास ? मला ओळखलेस ? ही तुझी आजी बघ, आई बघ आजोबा बघ हा बघ तुझा लाडका रघुकाका याने तुला काय आणलंय बघ अशोकची घाई पाहून डॉक्टर म्हणाले, "अशोकराव धोका टळला आहे पण बेबीला स्वस्थ विश्रांती घेऊ द्या. हा रघुवीर नव्हे तर प्रत्यक्ष श्रीबाबाच त्यांच्या रूपाने आले आणि त्यांनी बेबीला जीवदान दिले. आता आपणाला त्या शक्तीची कल्पना आलीच आहे. आम्ही कळसूत्री बाहुली तो नाचवील तशी नाचणार.

अशोकाने शरमेने मान खाली घातली. जवळच उभ्या असलेल्या रघुवीरला घट्ट मिठी मारत तो म्हणाला, "रघू, मी चुकलो. तूच खरा रे बाबा. तुझ्या म्हणण्या प्रमाणे खरंच मी सर्वांना घेऊन शिरडीला तुझ्या आधी धावत जाईन त्या श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु साईबाबांची क्षमा मागीन—लोटांगण घालीन आणि माझ्याही भक्तीने मी त्याला अंकीत करून घेईन. चिमुकली बेबी टाळ्या पिटीत होती सर्वजण आनंदाश्रु ढाळत होते.

●●●

# शिर्डीस येणाऱ्या साई भक्तांनो इकडे लक्ष द्या :

१) बस स्टँड पासून श्रीसाईबाबा मंदिर व संस्थान परिसर उत्तरेस अवघ्या एक फर्लांग अंतरावर आहे तेव्हा तिथे पोहोचायला कोणत्याही मध्यस्ताची गरज नाही.

२) सोबत सामान असल्यास संस्थान अधिकृत बिल्ला असणाऱ्या हमाला मार्फतच ते आणा. संस्थानने ठरवून दिलेल्या दराने हमाली द्या.

३) संस्थान तर्फे निवासाची सोय पाहिजे असल्यास प्रथम चौकशी कार्यालय व निवास कार्यालयासी संपर्क साधा. तिथे असलेल्या कर्मचाऱ्यांना आपणा सोबत असलेल्या पुरुष, स्त्री, मुले यांच्या संख्ये बद्दल खरीखुरी माहिती सांगा, आणि तिथे ठेवलेल्या नोंदवहीत आवश्यक ती खरी माहिती लिहा.

४) साई निवास हे मुख्यतः अतिथी करिता आहे. इतरांना ब्लॉक्स देणे न देणे हे व्यवस्थापकीय गरजेवर अवलंबून असेल.

५) शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांच्या गर्दीचे प्रमाण पाहता त्या प्रमाणात निवासांची उपलब्धता नसल्यामुळे जास्तीत जास्त भक्तांची सोय व्हावी म्हणून संस्थानच्या निवास स्थानात दोन दिवस रहाण्याचा नियम आहे. मुदत वाढवून देणेची गळ घालू नका.

६) गर्दीचे वेळी सर्वांची सोय व्हावी म्हणून खोली मध्ये २–२ कुटुंबांची रहाण्याची सोय केली जाते. थोडी गैरसोय सहन करून व्यवस्थापनास सहकार्य द्या.

७) शांती निवास हॉलमध्ये सामान ठेवण्याकरिता लॉकरची सोय आहे. तसेच समाधी मंदिरा लगत क्लोकरुमची सोय आहे. त्याचा लाभ घ्या.

८) समाधी मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ पादत्राणे सांभाळण्यासाठी पादत्राण-गृहाची सोय केली आहे. पादत्राणे पादत्राणगृहातच ठेवा. ती सुरक्षीत रहातील. समाधी मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर, वाटेत, अंगणात किंवा इतर ठिकाणी सोडू नका. कारण ती जाण्याची शक्यता आहे.

९) पुजेची ताटे, हार, फुल, प्रसाद सकाळी सात वाजण्या आधी स्वीकारली जात नसल्यामुळे ७ वाजे पर्यंत आणू नयेत. आणल्यास काकड आरतीच्या वेळी व बाबांचे मंगलस्नानाचे वेळी घेऊन थांबणे तुम्हासच अवघड होईल.

१०) काकड आरती सकाळी ५-१५ ते ५-४० वाजेपर्यंत असते, त्यानंतर ६ वाजता बाबांच्या मंगलस्नानाचा सोहळा सुरू होतो. तो पहाण्यासाठी मंदिरातच बसून रहा.

११) अभिषेकाची व सत्यनारायण पुजेची तिकीटे रांगेत जाऊन संस्थान लेखा शाखेतूनच व आपल्या पुरतीच खरेदी करा. अनधिकृत इसमा मार्फत खरेदी करू नका. तसेच दुकानदाराला किंवा तिकीटांचा काळा बाजार करणाऱ्याना ती देऊ नका.

१२) तुमच्या तिकीटावरील अनुक्रम नंबर पुकारल्या नंतरच पुजेच्या दालनात प्रवेश करा.

१३) पुजा साहित्य समक्ष दुकानदाराकडून भाव ठरवून खरेदी करा. मध्यस्ता मार्फत खरेदी करू नका.

१४) कपडे व इतर वस्तू लेखाशाखेत नोंद केल्याशिवाय समाधी मंदिरात अर्पण करू नका.

१५) समाधी मंदिराच्या बाहेर मागील दाराजवळ नारळ फोडण्याकरिता जागेची खास सोय केलेली आहे. तेथील दगडावरच नारळ फोडा. इतर ठिकाणी नारळ फोडू नका व नारळाच्या शेंड्याही टाकू नका.

१६) मंदिरात शिस्तीने वागून व शांतता पाळून व्यवस्थापनास सहकार्य करा.

१७) तक्रारी वेळीच संबंधित अधिकाऱ्याकडे मांडा, तक्रार पुस्तक मुख्य कार्यालयात ठेवलेले आहे.

१८) गरिबाना अन्नदान करावयाचे असल्यास पैसे लेखा शाखेतच भरा. भोजनाची तिकीटे घेऊन परभारे देऊ नका.

१९) गरीब व अपंगाना खाद्यपदार्थ वाटप परिसरा बाहेर करा. मंदिराजवळ करू नका, कारण तिथे गर्दी होऊन दर्शनास जाणाऱ्या इतर भक्तांना त्यांचा त्रास होईल.

२०) मंदिरात व बाहेर गर्दीच्या वेळी आपली खिशा पाकिटे, मौल्यवान वस्तू व लहान मुले सांभाळा.

२१) पाकीटे, मौल्यवान वस्तू, दागिने इत्यादी हरवल्यास संस्थानच्या संरक्षण कार्यालयास व मुख्य कार्यालयास तावडतोब कळवा. म्हणजे त्या सापडल्यास तुम्हास परत मिळू शकतील.

२२) दुसऱ्यांची पाकीटे, मौल्यवान वस्तू इत्यादी तुम्हांस सापडल्याच तर तावडतोब मुख्य कार्यालयात आणून जमा करा म्हणजे योग्य मालकाचा शोध घेऊन त्याला ती देता येतील.

२३) काही अडचण भासल्यास किंवा काही मदत पाहिजे असल्यास संस्थान कर्मचाऱ्यास विचारा. अनधिकृत व्यक्तीकडून मार्गदर्शन व मदत घेऊ नका, कारण फसवणूकीची शक्यता असते.

२४) संस्थानमध्ये दिलेल्या देणगी व इतर आकाराबद्दल रीतसर पावत्या घ्या.

२५) कोणासही लाच देऊ नका व प्रलोभने दाखवू नका.

२६) आपली सोय पाहताना इतरांची गैरसोय होईल असे वागू नका.

२७) संस्थान कर्मचाऱ्यांकडून सौजन्याची अपेक्षा बाळगा व त्यांचेशीही सौजन्याने वागा.

# श्रीसाईबाबांची कृपा

:—श्री. एन. बी. गुरपवार
'साईकृपा' विजय नगर, नांदेड–२

● मी १९६६ ला तंत्रनिकेतन महाविद्यालय नांदेड येथे शिक्षण घेत असताना माझे मित्र श्री. पाडुरंग माधवराव मिरासे यांच्या सहवासाने श्रीसाईबाबांकडे आकर्षित झालो व एकदा दोघे मिळून शिर्डीस जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. तेव्हापासून श्रीसाईबाबांचे नामस्मरण तसेच दर गुरुवारी श्रीदासगणूकृत "साईनाथ स्तवन मंजरी"चे वाचन करतो.

मला या काळात श्रीसाईबाबांच्या कृपेचे जे अनुभव आले ते मी देत आहे. १९७३ ला औरंगाबाद येथे असताना माझी पत्नी पहिल्यांदाच गरोदर होती. डॉ. सौ. वसुंधरा भागवत, औरंगाबाद यांच्याकडे नेहमी दाखवणे चालूच होते, व कसल्याही प्रकारचा त्रास नव्हता. सर्व काही एकदम नॉर्मल. दि. ३१ ऑक्टोबर रोजी बुधवारी पत्नीचे पोट दुखू लागल्याने पत्नीस बाबांची उदी कपाळी लावून व तोंडात टाकण्यास लावून आम्ही दोघे दवाखान्यात गेलो. रात्र गेली. दुसरे दिवशी म्हणजे 1 नोव्हेंबर १९७३ रोजी गुरुवारी दुपारनंतर पत्नीला प्रसूती गृहात नेले. पण बाळंत काही लवकर होईना. त्रास वाटू लागला. मला त्रास बघवत नव्हता. शेवटचा उपाय म्हणून ऑपरेशनची तयारी सुरू झाली. मी बाहेर व्हरांड्यात आलो व एकचित्ताने बाबांचा धावा केला. नामस्मरण करू लागलो. पत्नीचे बाळंतपण सुखरूपपणे झाल्यास मुलासह शिर्डीस येऊन समाधीचे दर्शन घेईन असे बोललो. यात चार पाच मिनीटे सुद्धा गेली नसतील तोच पत्नी बाळंत होऊन पुत्ररत्न झाले, ऑपरेशनची सुद्धा गरज भासली नाही. मी साईबाबांचे शतशः धन्यवाद मानले, नंतर दिड–दोन महिन्यांनी शिर्डीस जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन व अभिषेक करून आलो. मुलाचे नाव रविंद्र आहे. आज ६ वर्षांचा असून श्रीसाईबाबांच्या कृपेने सुखरूप आहे.

असेच एकदा मुक्काम नांदेड येथून १९७८ मधे मी, मुलगा चिं. रविंद्र व मित्र असे तिघे मिळून मोटार सायकलवर गावी जावून (तळणी) परत येताना नांदेड पासून जवळच दोन किलोमिटरवर असताना समोरून सायकल स्वार येत आहे असे पाहून एकदम ब्रेक लावल्याने मोटार सायकल एकदम उडी घेवून आम्ही तिघे जण एका बाजुला फेकले गेलो व मोटार सायकल एका बाजुला पडली. म्हणजे अपघातच झाला. पण साईकृपेने कोणासही किरकोळ जखम किंवा मुकामार लागण्या

पलिकडे काहिहि झाले नाही. लगेच उठून मोटार सायकल घेवून नांदेडला आलो व प्रथमोचार केला. यातून सुखरुपपणे वाचवणे ही साईबाबांचीच कृपा आहे.

१९७९ मधे नागपंचमीस माझी पत्नी सौ. शांता गुरपवार, मुलगा चि. रविंद्र, मुलगी कु. सविता व माझ्या पत्नीच्या दोघी बहिणीपैकी एक सौ. सुमन हसनपल्ली व दुसरी सौ. कौसल्या गुडेवार व त्यांच्या मुल मुली मिळून नांदेडपासून जवळच माहेरी कांजाळ या गावी गेल्या. पंचमी आटोपून मंगळवारी बैलगाडीने परत येत असताना बैल बुजले व फिरले यामुळे बैलगाडी उलटली आणि सर्वजण बैलगाडीच्या पाळण्याखाली सापडले. यातच सौ. कौसल्या गुडेवार हिच्या डाव्या मांडीवर घोडबाही पडून मांडीचे हाड मोडले. पण माझी पत्नी व मुले तसेच सौ. गुडेवार हिची मुले मात्र गाडीच्या पाळण्याखाली अलगद सुखरूप राहिली. सौ. हसनपल्ली व तिची मुले थोडावेळ अगोदरच गाडीखाली उतरून पायी चालत होती. म्हणून त्यांना सुद्धा काही झाले नाही. तेव्हा पत्नी व मुले एवढा अपघात होवून सुद्धा सुखरुप राहिली ती साईबाबांच्या कृपादृष्टी मुळेच.

लगेच कौसल्यास नांदेडला आणून डॉ. ग. पु. जोशी यांच्या दवाखान्यात दाखल केलं. तेव्हा डॉक्टरांनी प्रथमोपचार केला, व सल्ला दिला की, प्लॅस्टरने हाड जुळून येण्यास जास्त काळ लागेल. तेव्हा पुणे किंवा हैद्राबाद येथे नेवून ऑपरेशन करून हाड व्यवस्थित बसवून सोबत स्टील रॉडचा आधार दिल्यास लवकर बरे होईल व लवकर सुद्धा चालू लागेल. नांदेडहून हैद्राबाद जवळ व सोयीस्कर असल्याने बुधवारी खाजगी मेटॅडोर घेऊन कौसल्या, तिची आई, तिचे पती रावसाहेब गुडेराव, मुलगा नारायण, तिचे चुलते श्री उमाजीराव आनलदास, सासरे श्री व्यंकटराव गुडेवार व मी असे सर्वजण मिळून रात्री आठ वाजता नांदेडहून निघालो. ११ वाजता नरसी येथून श्री किसनराव तादेवार यांना सोबत घेवून हैद्राबादकडे निघालो. माझे मुखी श्रीसाईबाबांचे नामस्मरण चालूच होते, व प्रवास सुखरूप व्हावा अशी प्रार्थना चालू होती. तोच हैद्राबाद २०-२५ किलोमिटर असेल तेव्हा दि. २ ऑगस्ट १९७९ रोजी गुरुवारी पहाटे ५-३० वाजता ड्रायव्हरला झोप आवरत नसेल म्हणा व तशातच समोरून एक भरधाव ट्रक येत होता. त्यामुळे आमच्या ड्रायव्हरचा ताबा सुटून मेटॅडोर डावीकडून उजवीकडे नंतर उजवीकडून डावीकडे अशा झोकांड्या घेत उजव्या बाजूस जावून घासत घासत एका बाजूवर कलंडला. घर्षणाने जाळ होत असलेला दिसला. तेव्हा पेट घेते की काय असे वाटू लागले. पण पेट घेतला नाही. मेटॅडोर चालूच होती ड्रायव्हरला अगोदर इंजिन बंद करण्यास लावले ड्रायव्हर समोरची काच काढून

बाहेर पडला व मागचे दार काढण्यास लावले. कौसल्याचा पाय अगोदरच मोडलेला अजून काही झाले का म्हणून पाहू लागलो. पण तिच्या पायास लाकडी फळीने अगोदरच बांधलेले असल्याने काहीच झाले नाही. श्री उमाजीराव, किसनराव, व्यंकटराव यांच्या डोक्यांना किरकोळ जखमा झाल्या होत्या व सर्वांना थोडा बहूत मुका मार लागण्यापलिकडे काहीच झाले नव्हते. मुलगा चि. नारायण माझ्या जवळ असल्याने त्याला काहीच झाले नाही. गाडीत डिझेलने भरलेला कॅन होता. घर्षणाने ज्वाळा उठून पेट घेतला असत्या तर काय झाले असते, विचारच करायला नको. **"वेळ आली होती, पण काळ आला नव्हता"** असेच म्हणावे लागेल.

खरोखरच श्रीसाईबाबांच्या कृपेने आम्ही सर्वजण सुखरूप राहिलो. लगेच एक बस आली. त्या बसने हैद्राबादला पोहचलो. सौ. कौसल्याच्या मांडीचे ऑपरेशन झाले. एक महिन्याने नांदेडला परत आलो. आज ती पायी चालू लागली आहे.

अशा अनेक वेळी अवेळी भक्तावर आलेली संकटे पाहून श्रीसाईबाबा नकळत धावत येतात, व संकटातून सुटका करतात. त्यामुळेच साईबाबांची श्रद्धा अधिक-अधिक दृढ होत जाते, व अतूट प्रेम, विश्वास निर्माण होतो. सदा श्रीसाईबाबांचे नामस्मरण होत रहाते. अशीच आम्हावर श्रीसाईबाबांची कृपा रहावी हिच बाबांच्या चरणी नम्र प्रार्थना.

भक्ताला आलेला एक चित्तथरारक अनुभव

# ज्याच्या मुखी साई साई
# जगी त्यास भय नाही

—कु. वासंती एम. कर्णिक बी. ए. बीएड
मु. पो. चिंचणी

● २८ नोव्हेंबर ७६ चा दिवस त्या दिवशी संध्याकाळी मी व माझी धाकटी बहिण चि. शैला पेढीवर सोन्याचे दागिने घेण्यासाठी म्हणून घरातून बाहेर पडलो. दागिने घेऊन सुखरूपपणे वसई येथून विरार स्टेशनवर उतरलो पण दुर्दैव असे की गाडीतून उतरल्यावर भाजी घेण्याच्या निमित्ताने म्हणून रेल्वे लाईन मधूनच चालत जात होतो.

भली मोठी गुड्सट्रेन उभी होती. तिसऱ्या ट्रॅकवर सिग्नल होते व चवथ्या ट्रॅकवर गुड्सचे २ डबे होते म्हणून की काय माझी चूक झाली व मी गुड्सखालून जाऊ लागले, इतक्यात गुड्स सुरू झाली. माझे पाय लटपटू लागले व मला क्षणार्धात काय झाले हे समजले नाही. माझी बहीण मात्र उभीच होती. ती धावत धावत मजजवळ आली. पहाते तो माझे दोन्ही पाय गुड्सने कापलेले. तिने आक्रोश केला. सर्व लोक धावत धावत आले. मला मात्र श्रीसाईने इतके धैर्य दिले होते की मला पाय गेल्याचे दुःख झाले नाही. उलट मी बहिणीचे सांत्वन केले व म्हटले ही घे माझी पर्स व तू घरी जा. आईला काहीही सांगू नकोस मी मरत नाही. उद्या मला डॉक्टर घरी पाठवतील असा आईस निरोप दे.

अनंता तुला ते कसे रे स्तवावे ? हे सद्गुरुसाई अष्टक माझ्या मुखातून सतत बाहेर पडत होते. सर्व लोकांची मला लाज वाटत होती. मी डोळे घट्ट मिटून घेतले होते. पोलिस आले त्यानी पंचनामा केला, त्यानाही मी सांगितले. मी आत्महत्या केली नाही. माझे सर्व घरचे लोक खूप चांगले आहेत.

माझे काका व त्यांची सर्व मुले निरोप मिळताच मला विरार स्टेशनवर पहावयास आली. काकांच्या मुलानी तर वासंती ! हे काय ! म्हणून जोरात किंचाळीच मारली तेव्हा त्यास मी म्हणाले, अरे पुरुषासारखा पुरुष असून घाबरतोस काय ! रडतोस काय ? मी लोखंडाचे पाय लावीन व चालत घरी येईन बघ. माझा साईवर खूप विश्वास आहे.

मला सायन हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. तेथे गेल्यानंतर मी बेशुद्ध पडले. माझे एक्सरे वगैरे इलाज केव्हा केले ते मला कळलेसुद्धा नाही. सतत ८ तास ऑपरेशन चालू होते. डॉक्टरांनाही साईदर्शन झाले होते की काय कोणास ठाऊक ? त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले व मी मृत्यूच्या दाढेतून वाचले. माझे दोन्ही पाय कापले होते पण मला काहीच समजत नव्हते. साईनाथ नावाचा माझा एकुलता एक भाऊ माझी अहर्निश सेवा करीत होता त्याला धीर देण्यासाठी सर्व नातेंवाईक मंडळी सोबत होती. त्यांच्या प्रयत्नांने मी आज लाकडी पाय घालून शाळेत जात आहे व शिक्षिकेची नोकरी करीत आहे.

मी नोकरीच्या निमित्ताने माझ्या चि. सौ. पुष्पा नावाच्या बहिणीकडे राहते. तिचे व तिच्या पतिराजांचे मुलाबाळांचेही मला उत्कृष्ट सहकार्य मिळत आहे. केव्हा केव्हा घरात वाद-विवादाचे प्रसंग आले की मी सतत साई चिंतन करते व माझ्यावरील दुर्धर प्रसंग टळतात.

म्हणतात ना ज्याच्या मुखी साई साई ।

जगी त्यास भय नाही ॥

---

# – रखवाले साईनाथ –

—श्री. स. व्यं. कुलकर्णी, एम्. ए.
२४६५ अ, वरुणतीर्थ वेस कोल्हापूर,

● माझा दोन नंबरचा मुलगा सपत्नीक मिरजेत नोकरीस असून त्याचे विश्रामबागेत बिऱ्हाड आहे. घटनेचे वेळी मी मिरजेत राहात होतो. सप्टेंबर १९८० मध्ये शेवटचे आठवड्यात हा मुलगा माझ्याकडे नेहमीप्रमाणे आला व जाताना उद्या कचेरीचे कामासाठी कोल्हापूरास जाऊन येतो सायंकाळपर्यंत परत येईन असे सांगून गेला. त्यानंतर दोन-तीन दिवसांनी दुपारचेवेळी त्याची पत्नी म्हणजेच माझी स्नुषा येऊन सांगू लागली की हे दुपारी येतो म्हणून सांगून गेले त्यास आज तिसरा दिवस काही पत्ता समजत नाही. हे ऐकून सर्वचजण बेचैन झालो. पत्नीने श्रीबाबांना नमस्कार करून "श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी" हे स्तोत्र वाचावयास सुरुवात केली. मीही कोल्हापूरला एक पत्र लिहिले. पोथी संपल्यावर पत्र पोष्टाचे पेटीत टाकावे म्हणून थांबलो, व परत आत जाऊन श्रीबाबांना नमस्कार करून प्रार्थना केली की पोथी संपणेपूर्वी मुलगा घरी यावा

याप्रमाणे प्रार्थना व नवस करून मधल्या दरवाजात समोर रस्त्याकडे पहात उभा होतो. स्तवनमंजिरी संपत आली. शेवटच्या ओव्या चालू असतानाच मुलगा समोरून आलेला दिसला. पोथी संपायला आणि तो आत यायला एकच गाठ पडली.

मुलाला पाहताच हृदय हेलावले व भक्ति प्रेमाने उचंबळले. श्रीबाबांच्या अगाध सामर्थ्याचे वर्णन कोण करू शकेल 'अनंता मुखांचा शिणे शेष गाथा आणि म्हणूनच' नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथा.

आता मुख्य अनुभवकथा पूर्वीच्या अनुभव कथेतून कथन केल्या प्रमाणे मागील विजयादशमीस व तत्पूर्वी आमचे कुटुंबाचा तात्पुरता मुक्काम मिरजेस होता. कोल्हापूरचे घर रिकामे कुलूप लाऊन ठेवलेले. माझा एक मुलगा चि. शंकर याची कचेरी त्यावेळी कोल्हापूरात होती व तपासणीमुळे विजयादशमी पूर्वी दोन दिवस तो कोल्हापूरचे घरी राहिला होता. त्यानंतर रविवारी सुटी व सोमवारी विजयादशमी तो मिरजेसच होता. मंगळवारी तो घराकडे गेला नाही. बुधवारी सायंकाळी माझा मेहुणा श्री. चंद्रकांत कुलकर्णी (पत्नीचे बंधु) यांना रस्त्याने जाताना घराचे कुलूप हललेले दिसले. त्यांनी शेजारच्या दोन माणसाना घेऊन घरात जाऊन पाहिले तर सर्व कड्या कोयंडे मोडलेले व कुलपे तोडलेली सामान विस्कटलेले. त्यांनी चि. शंकरला बोलावून आणून घरी बसविले व आम्हाला सांगणेस मिरजेस आले. आम्ही ही पहाटे आलो. सर्व कुलूपे मोडलेली सर्व कपाटातील सामान विस्कटलेले—म्हणजे बाहेर काढून तपासून पुन्हा आत कसे तरी ठेवलेले त्यातून पुस्तकाचे कपाटही सुटले नाही. माझी पुस्तके मुलांच्या कप्यात तर मुलांची पुस्तके माझ्या धार्मिक पुस्तकात याप्रमाणे सरमेसळ अस्ताव्यस्त कसे तरी ज्या त्या कपाटातील सामान त्या त्या कपाटात रचून टाकलेले. गेले मात्र काही नाही. नेण्यासारखे काहीच नव्हते असे कसे होईल बरेच काही होते. शेजारी चौकशी करता मंगळवारी देखील कुलूप हललेले शेजारच्या बाईंनी पाहिले होते. पण गडबडीत शंकर कुलूप लावणेस चुकला असेल असे समजून त्या गप्प राहिल्या. म्हणजे सोमवारी रात्रीच हा प्रकार घडला असला पाहिजे. म्हणजे सोमवार रात्रीपासून बुधवार रात्रीपर्यंत घर उघडेच होते. निदान ज्यानी कुलुपे तोडली त्यांना तरी हे माहीत होतेच परंतु काहीही गेले नाही तुटलेली कुलूपे व मोडके कोयंडे देखील एका सूट केसमध्ये भरून ठेवलेले नंतर मिळाले.

आता शिल्लक प्रश्न राहतो तो असा की भर वस्तीत रहदारीचे रस्त्यावर विजयादशमीचे रात्री म्हणजे रात्रभर थोडीबहुत रहदारी व शेजारी जागा असताना चोरानी धाडस करून रस्त्यापासून आत कडेपर्यंत सर्व कुलपे तोडली हे धाडस

करण्याचे कारण ? हेतु असलाच पाहिजे. कपाटांची कुलुपे तोडून सामान कागदपत्र यात काही मौल्यवान वस्तूही होत्या की ज्या चोरास नेणे सहज शक्य होते. बरे विशेष आश्चर्य मला या गोष्टीचे वाटते की पुन्हा सामान होते तसे भरून ठेवणेचा प्रयत्न केला. त्याला नेण्यासारखे काही नव्हते तर तसेच टाकून गेला असता. त्याला परत भरून ठेव म्हणायला कोण होते. पुन्हा त्यावेळी काही चाहूल लागली व म्हणून पळाला म्हणावे तर पुढे दोन दिवस तसेच घर उघडे त्याने ठेवले तसेच होते. पण परत येण्याचे धाडस नाही.

या सर्वांवरून माझ्या पुरता मी हाच निष्कर्ष काढला की चोर हात चलाखीचे नादात असताना श्रीबाबांनी त्यांना कोणत्या तरी भयानक स्वरूपात दरडावून सांगीतले की चोरहो बाहेर काढलेले सामान होते तसे भरून ठेवा बाहेरच्या दाराला. कुलूप लावून ठेऊन शिस्तीने जीव घेऊन पळा नाहीतर जीवास मुकाल. ! . . .

काही असले तरी बाबांनी आमचे, आमचे घराचे चीजवस्तुचेही रक्षण केले. 'कौन बिगाड सके उसका जिसके साई रखवाले है' या उक्तीचे हे जिवंत उदाहरण नव्हे काय !

या साईनाथांच्या लीला 'साईलीले'तून प्रसिद्धिस देणे बद्दल श्रीबाबांचीच आज्ञा असल्याने त्यांची लीला त्यांनी वदविली त्याच शब्दांत त्यांच्याच चरणी समर्पण.

॥ श्रीसद्‌गुरु साईनाथ चरणार्पण मस्तु ॥

# जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ! ! !

—सौ. सुलभा दिनकरराव कुलकर्णी

हिराबाई ढगे चाळ रुम नं. १८

बेलूरकर पाडा कल्याण.

● गेल्या ३ वर्षापासून आम्ही पती पत्नी श्रीसाईबाबांना खूपच जवळ केले आहे. दरवर्षी उन्हाळयात आम्ही बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला जातो तेथे रहाणे वगैरे त्रासात काढतो. पण दरवर्षी तेथे जावयाचे हा निग्रह करतो. त्याला कारण मनापासूनची बाबांची श्रद्धा हीच होय आणि त्याचा प्रत्ययही आम्हांला पुष्कळदा आला आहे तरी पण एक दोन उदाहरणे अगदीच अविस्मरणीय आहेत.

आम्हांला एक दोन वर्षांची मुलगी आहे. ५।६ महिन्यापूर्वी तिला एके दिवशी उलट्या–संडास यांनी खूपच हैराण केले. डॉक्टरांचे औषध चालूच होते तर दुसऱ्या दिवशी रात्रीपासून लघवी बंद झाली. सकाळी डॉक्टरांनी १-२ इंजेक्शने दिली व ४ वाजेपर्यंत जर लघवी नाही झाली तर मोठया हॉस्पिटलमध्ये दाखल करावे अशी चिठ्ठी पण लिहून दिली कारण ४ वाजता आमच्या डॉक्टरांची भेट होणार नव्हती. शनिवार होता. माझे पती बँकेत कामाला असतात. अर्धा दिवस असतो. सकाळी कामावर जाण्यास हरकत नाही असे डॉक्टरांनी सांगितल्यावरून ते गेले होते. तसे दुपारी १-२ वेळा फोनवर त्यांना इंजेक्शने वगैरे दिल्याची कल्पना दिली होती. ते दुपारी ३॥ वाजता घरी आल्यावर डॉक्टरांचा ४ वाजेपर्यंतचा निरोप त्याना सांगितला. व तोपर्यंत लघवीही झाली नव्हती. त्यांचाही चेहरा पडून गेला. शनिवार असल्याने व काळजीने आम्हा दोघांच्याही पोटात काही नव्हते परंतु मुलगी मात्र चांगली खेळत वगैरे होती. कसेबसे वरणभात आम्ही पोटात ढकलले. यांनी मला सांगितले की तू काही काळजी करू नकोस बाबा आपल्या पाठीशी आहेत असे म्हणून बरोबर ४ वाजता बाबांची उदी मुलीला लावली व तोंडात दिली, आणि जादू व्हावी तशी बरोबर ४ वाजून ५ मिनीटांनी मुलीला लघवी झाली. आम्ही पती-पत्नी बाबांच्या फोटोसमोर अक्षरशः नतमस्तक झालो.

अशाच एक प्रसंग ३० जानेवारी ८० रोजी माझ्या पतींना खूप ताप, सर्दी, डोकेदुखी सुरू झाली. २ फेब्रुवारीला मुलीचा वाढदिवस होता तो साजरा करावयाचा असे आम्ही आधी ठरवले होते. दोन–दिवस झाले औषध देवूनही ताप उतरत नव्हता. शेवटी १ फेब्रुवारीला रात्री ह्यांनी मला सांगितले की तू मला बाबांची उदी

लाव त्यांच्या मनात असेल तर ते मला मुलीच्या वाढदिवसा दिवशी कमीत कमी ताप उतरल्याची भेट देतील आणि तसेच झाले. १ फेब्रुवारीला मी त्यांना रात्री उदी लावली व मध्यरात्रीपासूनच ३ दिवस भरपूर आलेला ताप उतरला.

जणू काही बाबांनी हाक दिली की सांगतात तू जेथे आहेस तेथे मी सोबतीला घाबरू नको.

बाबांविषयी लिहित बसले तर पानेच्या पाने भरतील व वेळही पुरणार नाही हे मला नेहमी सांगतात की बाबांबद्दल फक्त एकच लक्षात ठेवावे की

**" जेथे जातो तेथे बाबा माझे सांगाती " ! ! !**

---

# आले घरा साईनाथ

—श्री. स. मा. मुऱ्हार
क्वा. नं. १२४ चंदननगर, मेडीकल रोड
नागपूर.

● बरेच दिवसा पासून मनात होते की, घरी श्रीसाईबाबांचा एक मोठा फोटो लावावा. योगायोग तसाच आला. मी मुळचा बुलंढाणा जिल्ह्यातील मेहकर या गावी राहणारा पण नोकरी करिता नागपूरला आलो. एकदा मी माझे गावी गेलो. तेथून श्री सखाराम महाराज सं. लोणी येथे यात्रा असल्या कारणाने त्या यात्रेस मी गेलो. यात्रा मोठी भरत असल्या मुळे तिथे टुरींग टॉकीज येतात. एका टॉकीजमधे शिरडीचे श्रीसाईबाबा मराठी, पहिल्याने निघालेले पिक्चर लागले होते. श्रीसाईबाबांचे पोस्टर मला फारच आवडले मी टुरींगच्या मालकाकडे एक पोस्टर मागीतले. मंदिरातील श्रीसाईबाबांच्या मूर्तिचीच ती पोज होती. सर्वच पोस्टर्स मंदिराच्या परकोटावर व यात्रेत लावली गेली होती त्यामुळे पोस्टर शिल्लक नसल्याचे कळले. मन थोडे नाराज झाले. टॉकीज कडून श्री सखाराम महाराजांच्या मंदिराकडे जात असताना एक पोस्टर हवेने अर्धवट निघालेले मला दिसले. मी ते हस्तगत केले. मनाला आनंद झाला. घडी करून पेटीत ठेवले. परत नागपूरला आलो. घरी आल्यावर ते चित्र पेटीतून काढले. घडी उघडली त्या चित्राचे चार तुकडे होतील असी त्याची स्थिती होती. चिक्कीने तो कागद कडक झाला होता. त्या चित्रास ब्राऊन पेपर चिकटवून व ऑईल पेन्ट करून फ्रेम केली व बैठकीत तो फोटो लावला. फ्रेम २२"×३०" ची असल्यामुळे बैठकीत हे एक आकर्षणच आहे. मनात जी तळमळ होती ती श्रीसाईबाबांनी पूर्ण केली. मी या बैठकीस श्रीसाई दरबारच समजतो.

एकदा माझे पत्निची प्रकृती सिरियस झाली होती. मला कोणीतरी सांगितले की, डॉ. धर्माधिकारी यांना प्रकृती दाखवा. मी या डॉक्टरांना पाहिले नव्हते. दिवसभर ड्युटी करून सायंकाळी दवाखान्यात गेलो डॉक्टर व्हिजीटला गेले होते. कम्पौडरने सांगितले आता डॉक्टरची भेट होणे शक्य नाही. त्यांची ड्युटी संपली. तितक्यात डॉक्टरांचा स्टेथॅसस्कोप दवाखान्यात राहिल्यामुळे रिक्षेवाला तो नेण्यास आला. कम्पौडरने त्या माणसा बरोबर मला जाण्यास सांगितले. माझी व डॉक्टर साहेबांची भेट झाली व ते घरी आले. त्यांनी ट्रिटमेंट दिली पत्निची तब्येत चांगली झाली. त्यांनी श्रीसाईबाबांचा एक फोटो माझेकडून काढून मागितला. मी त्यांना रंगीत ऑईल पेन्टचा फोटो प्रेझेन्ट म्हणून दिला. डॉक्टरसाहेब श्रीसाईभक्त व दत्त उपासक आहेत. त्यांचे व माझे संबंध घरोब्याचे झाले आहेत ही श्रीसाईबाबांचीच कृपा.

जेव्हा जेव्हा मनात आले तेव्हा तेव्हा मला शिरडीला जाण्याचा योग आला. एकदा श्रीसाईबाबांच्या दर्शनास गेलो असता शिरडीला तीन दिवस मुक्काम झाला. त्यामुळे रोजची पूजा सांज सकाळची आरती भजनाचे कार्यक्रम सर्वच सोहळा मनसोक्त उपभोगता आला. एक दिवस गायक कलाकारांची बैठक होऊन सुश्राव्य गायन ऐकावयास मिळाले. टुरीस्ट मोटारने ही मंडळी तिथे आली होती. कुणी मुंबईचे कुणी पुण्याचे कुणी इंदोरचे गायक होते. इंदोरची एक गायीका होती. त्या गायीकेने 'उघड नयन आता साईनाथा' हे भजन म्हटले. मला ते भजन फारच आवडले. मज जवळही श्रीसाईबाबांची स्वर चित काही भजने होती. ती भजने त्या मंडळीस दाखवावी अशी इच्छा झाली. मी तबलजीजवळ बसलो होतो व त्यास विचारलेही ह्या बाई कोण? माझा परिचय नसताही त्या गृहस्थाने त्या गायीकेची ओळख करून दिली. त्यांनी माझी भजने पाहिली व समाधान व्यक्त केले. मला ती भजने लिहून मागितली. दुसरे दिवशी ती मंडळी शेगावला जाणार होती. श्रीगजानन महाराजांचे 'दुर्वांकुर' व भजनावली स्वरचित मी छापलेली ही पुस्तके त्यांना सप्रेम भेट दिली. श्रीसाईबाबांचे चरणी माझी सेवा रुजू झाली असे मी समजतो.

इ. स. १९७७ साली पुनः शिरडीला जाण्याचा योग आला. संस्थानच्या काही मंडळीच्या ओळखी झाल्या. त्यापैकी संस्थानचे एक ट्रस्टी नागपूरला आले होते. नागपूरला त्यांचा मुक्काम बरेच दिवस होता. शिरडीची ओळख असल्या कारणाने त्यांनी मला भेटीस बोलावले मी भेटीस गेलो त्यांना समाधान वाटले. ते आजारी असल्या कारणाने इथे बरेच दिवस ते होते. एक दिवस मी त्यांचे भेटीस

गेलो असताना घरची सर्व मंडळी बाहेर गेली होती. जवळ मी एकटाच होतो. अचानक त्यांच्या प्रकृतीत बिघाड झाली. त्याचा श्वास वर झाला. मी घाबरलो त्यांनी श्रीसाईबाबांची विभूती छातीस चोळण्यास सांगितली. मी विभूती त्यांचे छातीस चोळली. त्याचा श्वास मोकळा चालू झाला, व ते बोलू लागले विभूतीवरच त्यांची श्रद्धा होती. शिरडीस यांचे श्रीसाईबाबांचे सेवेत पन्नास वर्षे गेलीत असे ते सांगत होते. नागपूरलाच ते श्रीसाई चरणी लीन झाले. कै. आ. ना. सावंत हे त्यांचे नाव होते. श्रीसाईबाबाच त्यांचे रुपाने इथे आले व विभूतीचा चमत्कार मल घडविला असे मी समजतो.

---

# शिरडी–वृत्त माहे जून सन १९८०

जून महिन्यामध्ये बाहेर गावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पहिल्या पंधरावड्यात जास्त प्रमाणात होती. त्यानंतर गर्दीचे प्रमाण थोडे कमी झाले. काही कलाकारानी श्रीचेपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :—** १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) सौ. सरोज रा. बर्डे गोरेगाव मुंबई यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन :—** १) ह. भ. प. विठ्ठल महाराज हैद्राबाद यांचे प्रवचन झाले.

२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन वादन वगैरे :—** १) श्री. श्रीकांत दा. जेऊरकर डोंबिवली.

२) श्री. सावता (बाबा) महाराज, सोलापूर.

३) सौ. गयाबाई शा. भोसले अमरावती.

४) श्री. ऐशीराम मो. मनुजा मुंबई. ५) श्री. पंढरीनाथ जाधव. हैद्राबाद. ६) श्री. उत्तमराव पंडीत हैद्राबाद. ७) श्री. लक्ष्मण देवासकर मुंबई. ८) सौ. मनोरमाबाई व्यास भोपाळ. ९) कु. विजया स्वामी भोपाळ. १०) कु. शोभा राणे मुंबई. ११) श्री. श्रीकांत मिश्रा छिंदवाडा. १२) श्री. फक्कडराव धों. वाडेकर. अ. नगर. १३) श्री. आर. पी. नायडू हुबळी. १४) सौ. आर. शांता नायडू हुबळी. १५) श्री. सदाशिवराव गायवल. अ. नगर. १६) श्री. रामचंद्र द. वाडेकर शिरडी. १७) श्री. नरेश ल. सोमण नागपूर. १८) श्री. सुभाष पटवर्धन डोंबिवली. १९) श्री. चोखीलाल खेडूले. रायपूर. २०) श्रीमती जयश्री तारडे. रेडीओस्टार भोपाळ. २१) श्री. राजेंद्र कुमार तारडे खांडवा. २२) श्री. एस. राजगोपाल. वृंदावन भजन मंडळ. तामिळनाडू.

२३) श्री. रामानंद स्वामी कर्नूल. २४) श्री. दत्तात्रय के. कर्णिक ठाणे. २५) श्री. सुनिल द. कर्णिक ठाणे. २६) श्री. दत्तात्रय रा. आंबर्डेकर वेंगुर्ले. २७) श्री. सोहनलाल शर्मा देहली. २८) सौ. विजया लक्ष्मी वर्जे कोपरगाव. २९) श्री. प्रसाद वर्जे कोपरगाव. ३०) श्री. रमेश सावंत कोपरगाव. ३१) श्री. आढाव मास्तर कोपरगाव. ३२) कु. लीला बा. शेलार. ठाणे. ३३) श्री. महादेव वि. खवणेकर. रत्नागिरी.

**हवापाणीः**-शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. भरपूर पाऊस पडत असल्यामुळे वातावरण आल्हाददायक आहे.

## – अभिनंदन –

कु. मंगेश दत्तात्रय बागवे. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय शिरडी हा विद्यार्थी माहे एप्रिल सन १९८० मध्ये झालेल्या एस. एस. सी परीक्षेत ७०० पैकी ५३१ गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. ७६% गुण मिळवून इंग्रजी विषयात १०० पैकी ८५ गुण मिळाल्यामुळे सर्वांमध्ये प्रथम आला. त्यामुळे श्रीमती मंदाकिनी कळसकर मुलुंड यांनी ठेवलेल्या "कै. दत्तकुमार कळसकर पारितोषिक" रु. ९०।- चे त्यास मिळणार आहे. विविध प्रकारच्या स्पर्धामधे व खेळामधे भाग घेऊन त्याने अनेक पारितोषिके मिळविली. तो हुशार विद्यार्थी म्हणून सर्वांमधे प्रसिद्ध होता. शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच यश संपादन करता आले असे तो सांगतो. गव्ह. पॉलि टेकनीकलमधे प्रवेश घेत असल्यामुळे तेथेही चांगले यश संपादन तो करेल अशी शिक्षकांना आशा आहे. त्याचे वडील श्रीसाईबाबा-संस्थानमधे नोकरीस आहेत.

# श्रीसाई परिवार वृत्त विशेष

× लोनावळे येथील डॉ. इंदू नाईक व डॉ. सुमती खानविलकर यांच्या मुक्ता नर्सिंग होम, सीताकुंज मुंबई–पुणे रस्त्यावरील निवासस्थानी श्रीसाईबाबांची पंचधातूची मूर्ती स्थापन करण्याचा समारंभ रविवार ता. २९ जून ८० रोजी मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुंबई, पुणे, पिंपरी शिरडी येथील स्नेहशील साईभक्तमंडळी हजर होती. दोन दिवस भरगच्च विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

❖ ❖ ❖

× वरळी येथील प्रसिद्ध वयोवृद्ध साईभक्त श्री. मोहितेबाबा यांनी जांबोरी मैदान येथील आपल्या साईनाथ मंदिराचा रजिस्टर्ड ट्रस्ट केला असून श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे माजी कोर्ट रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक हे त्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष आहेत.

☆ ☆ ☆

× श्रीसाईभक्त लेखक आणि कवी श्री. विजय हजारे एम्. ए. यांनी साईभक्त कवींच्या साई कवितांचाच एक प्रातिनिधीक असा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचे योजिले असून त्यासंबंधी पत्रव्यवहार श्री. विजय हजारे सी. ६ गुंफा दर्शन हौसिंग सोसायटी १ ला कार्टर रोड, मु. पो. बोरीवली (पूर्व) मुंबई ६६ येथे करावा अशी विनंती ते करतात

## श्री. किसन खेडेकर यांचे निधन

मुंबापुरीतील एक साईभक्त श्री. किसन खेडेकर अल्पशा आजाराने ता. १५ मार्च ८० रोजी झोपेतल्या झोपेत अकस्मात, निधन पावले. गेली ४० वर्षे त्यांचा शिरडी संस्थानशी संबध होता. प्रत्येक उत्सवप्रसंगी त्यांनी स्वयंसेवक म्हणून तिथे हजेरी लावून त्यांनी बाबांची सेवा केली आहे यामुळे त्यांचा बहुसंख्य मंडळींशी परिचय होता. दररोज बाबांची पूजा-पाठ पोथी केल्याशिवाय त्यांचे कुटुंबातील कुणीही भोजन करीत नसे.

श्रीसाई मृतात्म्यास सद्‌गती देवो.

—प्रेषक **वसंत शृंगारपुरे** (बंडूमामा)

# श्रीसाईगीत तुषार

—कवी-श्री. सुहास महादेव देसाई
सी. जी. एस. कॉलनी सेक्टर ६
अँटॉप हिल, मुंबई ३७

[ श्रीसाईबाबांचे एक भक्त आणि मराठीतील एक उदयोन्मुख कवी श्री. सुहास देसाई यांनी लिहिलेले श्रीसाईगीत तुषार हे या अंकापासून आम्ही क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. श्रीसाईबाबांवर आजवर असंख्य श्लोक, अभंग, गीते, पदे इ. साहित्य रचले गेले आहे, रचले जात आहे व रचले जाणार आहे. श्रीसाईगीत तुषार वाचताना रसिक भक्तांनी प्रथम गद्यातील निवेदन वाचावे त्याचाच पद्यरूप सारांश त्यांनी रसाळपणे प्रासादिक शैलीत आणण्याचा यशस्वी यत्न केला आहे. —का. संपादक ]

यदा यदा हि धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानम् धर्मस्य, तदात्मनं सृजाम्यहम्
परित्राणाय साधुना, विनाशायच दुष्कृताम्
धर्म संस्थापनार्थाय, संभवामि युगे युगे ॥

विश्व व्यापी दिगंबर गीतेतील महान संदेशाप्रमाणे ह्या जगात चैतन्य प्रेम, बंधुभाव, शांति निर्मिण्यासाठी प्रत्येक युगात जन्म घेतो, कधी राम, तर कधी रहिम, कधी अल्ला तर कधी श्रीकृष्ण अशी अनंत रुपांची ही नामावली असली तरी ईश्वर एकच आहे. अनंत कोटी ब्रह्मांड नायक श्री सद्‌गुरु साईनाथ हे पण ब्रह्म चैतन्य; पण हे लपले होते कुठे.

महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील धूपखेड्यांच्या जंगलात एका विस्तृत झाडाच्या शांत छायेत पहूडले होते, तोच धूपखेड्याच्या पाटलाची हाक त्यांच्या कानावर आली. बिजली ऽऽ बिजली ऽऽ पाटलांचा आत्मा परम पवित्र अशा ब्रह्म चैतन्याच्या भेटीस आतुरला होता. परंतु कारण हे असावेच लागते. घोडी हरवण्याचे क्षुल्लक कारण पण योग ईश्वरी मिलनाचा धन्य ते चांदभाई:—

# साईबाबा भक्तीकृपेने गीत मी गातो – १

वंदन करुनी सिद्ध–गणेशा साई कथा सांगतो ॥ धृ ॥

धूप खेडे ग्राम सानुले
चांदभाई पाटील तिथले
योग होता दैव फिरले
बहू मोलाचे लेणे हरवले

बिजली होते नाम घोडीचे रानामध्ये सूर नांदतो ॥ १ ॥

रानामध्ये तेज फाकले
विश्वाचे ते रुप आगळे
प्रभुरामाचे मूर्त सावळे
रामकृष्ण बाल कोवळे

त्रिमूर्ति तो दत्त दिगंबर, रानामध्ये ब्रम्ह चिंतितो ॥ २ ॥

शोधून घोडी चांद थकले
शांत विसावा शोधू लागले
वृक्षाखाली तरुण पाहिले
चांद म्हणोनी वदू लागले

नाम कसे ते ठाऊक झाले. आश्चर्याने चांद पहातो ॥ ३ ॥

चिलीम पिवुया बोलू लागले
अग्नी नसता अघटीत घडले
भूमातेचे कवच फाटले
तप्त अग्नींचे अंकुर आले

चिलीम प्यावया दोघे बैसले, घोडी येता चाँद पहातो ॥ ४ ॥

चांद भाईंनी नयनी पाहिले
दिव्यरवाचे तेज झळकले
यवनरुपी प्रथम भासले
गीता बोलता हिंदू वाटले

जातिभेद हे तेथेच शमले, प्रेमभावे चांद वंदितो ॥ ५ ॥

★ ★ ★

परम पवित्र ईश्वराच्या प्रगटतेचा महिमा अवर्णनीय होता. जातिभेदाच्या शृंखला तुटून पडल्या होत्या. चांदभाईंच्या त्या विनंतीला मान देऊन शिर्डीला जाण्याच्या हेतूने ते निघाले. चांदभाईंच्या भाच्याची वरात शिर्डीला आली. त्याच्या सोबत शिर्डी गाठली. वेशीवरच्या खंडोबाचे दर्शन घेण्यास निघाले. तोच खंडोबाच्या

मंदिराचा पुजारी श्री. म्हाळसापती नागरे यांच्यासमोर साक्षात् परब्रम्ह दिव्य चैतन्य उभे पाहून अंतःकरण भरून आले. भक्तीने सारे शरीर पुलकीत झाले. रोमारोमातून भक्तीरुप संवेदना स्फुरण पावल्या आणि त्यातूनच "साई" या मंगल नामाचा उद्रेक झाला. जगाच्या नामस्मरणासाठी जगाच्या कल्याणासाठी अजूनही विश्वात घुमतो आहे, आणि तो साई नाद यावश्चंद्रौ दिवाकरौ तो अभंग राहील.

॥ श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय ॥

# दिव्यत्वाची ज्योत पहाता मन बहरुन आले–२

म्हणून म्हाळसापती मुखातून साई नाम आले ॥ धृ. ॥
शिर्डी जावया वराड सजले
ढोल तमाशे वाद्ये गर्जले
क्रमा-क्रमाने सारे चालले
मार्गा मागून मार्ग संपले
कृष्ण सारथी असे सोबती, चांदभाई ते धन्य जहाले ॥ १ ॥
शिर्डी ग्राम ते दिसू लागले
वेशिवरती मंदिर इवले
खंडोबाचे स्थान आगले
ग्राम दैवत मानिती सगळे
म्हणून सारे तेथे उतरती, पुष्पभूमिला चरण लागले ॥ २ ॥
म्हाळसापतीने समोर पाहिले
बाल फकिर ते रुप आगळे
रुप पाहता तेज दरवळे
आवो साई, आवो साई, म्हणू लागले
बायजा, तात्या, स्तब्ध पहाती, हात जोडून वंदन केले ॥ ३ ॥
साईचे ते दर्शन झाले
हृदय मंदिर मुक्त जहाले
अंतर्यामी बोल उमटले
शब्द रुप ते बाहेर आले
साई, साई, बोल उभयता, प्रेमाश्रुंनी चरण स्पर्शिले ॥ ४ ॥
ग्राम खेडे शिर्डी चिमुकले
वैभव नव्हते शुष्क सगळे
वसंत येता ग्रीष्म पळाले
साई रुपे स्वर्ग लाभले
साईनाम ते मुखे प्रगटता, साईनाथ हो स्मित पावले ॥ ५ ॥

## लेणे

पहाटेच्या वेळा आठवे माय बापा
दिस होय सुखी जाळूनीया पापा ॥
रात्रंदिन आठवा बाबांच्या नावा,
उरी बाळगोनी आयुष्याचा ठेवा ॥
नको दुजे कामा, नको दुजे नामा,
एकच ओढ मनी जाण्या साई धामा ॥
साद घालावे 'साई' तया आतुरतेने
इंदू म्हणे घेऊनी 'श्रद्धा' सबुरीचे लेणे ॥

## छाया

नाम घेता 'साई'चे, प्रेम मिळे आईचे,
नाम घेता 'बाबांचे, प्रेम मिळे बापाचे ॥
य मिळे बापाचे, सुख मिळे आईचे,
मिलन ह्या दोघांचे, मिळे छायेत साईचे ॥
घेऊनी 'श्रद्धे'चा वसा, मनी सबुरीचा ठसा,
अनुभव शांती सुखाचा शिर्डी प्रतीचे माणसा ॥

—डॉ. इंदू नाईक
सीताकुंज लोणावळा

## आभार

आरंभी विनंती करू साई चरणाशी
अज्ञानी बालकास ध्यावी बुद्धी गुणगायना
अज्ञानी मी बाला कसे गुण गावू बाबा
सेवाही घडो तुमचीच नित्य आम्हा ( बाबा )
संसार सागर कशी जशी जाऊ तरोनी बाबा
तुम्हीच ध्यावी शक्ती नाव बल व्हायला
होतील कष्ट माझ्यामुळे बाबा तुमच्या देहाला
अक्षय अभय द्यावे बाबा माझ्या कुंकवाला

—रशमी रमेश कोरे
१५० ( काद्री वाड़ी ) एल. जे. रोड
खोली नं. ५ माहीम मुं. नं. ४०००१६

# श्रीसाईलीला

## लेखक-कवी वर्गणीदारांना महत्वाच्या सूचना

१) श्रीसाईलीलेकडे पाठवावयाचे सारे लेख, कविता, चित्रे इ. साहित्य संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ याच पत्त्यावर पाठवावे. वर्गणीदारांनी पण आपली वार्षिक वर्गणी रुपये दहा याच पत्त्यावर पाठवावी; किंवा स्वतः येऊन भरावी व रितसर पोचपावती घ्यावी व ती नोंदीसाठी म्हणून जपून ठेवावी ही विनंती.

२) लेखक-कवींनी लिखाण पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूने भरपूर समास सोडून, सुवाच्च अक्षरात नवीन शुद्धलेखन पद्धतीचे नियमास अनुसरून लिहून पाठवावे. लिखाण कागदाच्या दोन्ही बाजूस लिहून किंवा इनलंड लेटर किंवा पोस्टकार्डावर लिहून अजिबात पाठवू नये. ते स्वीकृत केले जाणार नाही.

३) श्रीसाईलीलेकडे लेखन पाठविताना श्रीसाईबाबा हाच प्रमुख विषय असावा. अन्य संतवाङ्मय, चरित्रे, भक्तीभाव, अध्यात्म, श्रीसाईभक्त, श्रीसाई मंदिरे इ विषयांवरही साहित्य श्रीसाईलीलेकडे पाठविले तरी चालेल.

४) लेखाची पोच लेखकास त्वरीत हवी असल्यास लेखासोबत १५ पैशाचे तिकीट किंवा कार्ड सोबत जोडावे म्हणजे पोच रितसर पाठविली जाईल. पाठविलेल्या साहित्याचा निर्णय सुमारे महिन्याभरात कळविला जाईल. नापसंत साहित्य परत पाठविले जाईल.

५) कवींनी निदान दोन वर्षे तरी कविता अजिबात पाठवू नयेत.

६) पोस्टाने पाठवावयाचे सर्व अंक दरमहा एक तारखेस दादर मुख्य कचेरीतून योग्य त्या नोंदी घेऊन रवाना केले जातातच. उशिरात उशिरा म्हणजे सुमारे ८ तारखेपर्यंत ते देशभरच्या वर्गणीदाराना मिळावेत. अंक न मिळाल्याची तक्रार नजिकच्या डाकघरी करावी व मगच आम्हास लिहावे. अंक शिल्लक असल्यास पुन्हा पाठविला जाईल परंतु अशी शक्यता कमीच असते.

..............

# असे बाबा साईनाथ !

त्या तिथे कोपऱ्यांत
आमच्या भक्तिची तसबीर
आकर्षक मूर्ती करून
बसविली आहे–शिर्डीस ॥

तशी ती आहे आकर्षक
आणि दिसतेही सुंदर
दर्शन घेता जे मनी असतं
ते त्या मूर्तीत मिळतं–साईच्या ॥

मूर्ती हलत नाही, डोलत नाही
पण जगांतील हालचाल पाही
असे बाबा साईनाथ–शिर्डीचे !!!

—श्री. एकनाथ एम्. मेस्त्री
६६/५२२ मोतीलाल नगर.
म. गांधी रोड, गोरेगाव, मुं. ६२

# साई माझा गुरु

साई माझा गुरु
साई कल्प तरु
प्रेमाचा सागरु । साई माझा

साई माझे आई बाप
संसाराचा हरी ताप
जगाचा उद्धारु । साई माझा

साई मज कृपा केली
दारी माझ्या गंगा आली
मन लागो बावरु । साई माझा

साई सार सर्व आहे.
शोधूनिया तूंच पाहे,
नको खंत करु । धांवे साई माझा.

—श्री. अनंत पां. कदम
बी. इ. एस. टी. क्वार्टर्स O ब्लॉक
डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुं. १२

# ऐसी माझी माऊली रे

विश्वाचा विश्राम रे । साई माझा राम रे
आनंदाने ध्यावूं त्यांचे । गुण गौरव गान रे ।
कडू लिंबा तळी रे । वेडे चाळे करीत रे
फकीराचे सोंग दावूनी । बोले अल्ला मालीक रे ।
द्वारकामाई मशीदीत । अग्नीकुंड चेतवुनी
उदी रूपे संजीवनी । ठेवूनी गेले खाण रे ।
नसे भाव भेद रे । जाती गोत पंथ रे
हिंदू मुस्लीम बोलावूनी । भोजन करीती साथ रे ।
जलांत भिजवूनी वात रे । दावी चमत्कार रे
भलत्यावेळी दिवाळीची । रोषणाई दाविती रे ।
न कळे कोणा बोल रे । संक्षिप्तची वाणी रे
ज्ञानाचा तो कोष रे । उणे पाडी ब्रम्हांड रे ।
ऐसी माझी माऊली रे । गेली म्हणती सारे रे
समाधी करवूनी घेवूनी । जना केले भ्रांत रे
ऐसे माझे साई नाथ । चमत्कारी देव रे
लाख लाख प्रणाम रे । चरणी त्यांच्या वाहाते रे ।
मुखी राहे सदा साई साई नाम रे
हिच माझ्या अंतरिची । लागलिशी आस रे

—सौ. तारा चोंदवणकर
राधा-माधव, टिळकनगर, चेंबुर

☆

# श्रीसाईला आवडतें तुळसीचे पान

साईला आवडते तुळसीचे पान
प्रभूला आवडते तुळसीचे पान ॥ धृ० ॥
जप तप साधन काही नाही लागत
आणिक प्राणायाम ॥१॥
पीत पितांबर भरजरी शेला
मुगूटावरी तुरा छान ॥२॥
पायी पैंजण दंडीया वाक्या
वाजती अन् छून छान ॥३॥
भक्ती प्रेमाने साईला वाहते
एकच तुळसीचे पान ॥४॥

— संग्राहक सुश्री. लिलावती कां. गुजराथी
शिर्डी

---

# अंतरीचा आनंद

जन म्हणती शिरडीस आहेत साईबाबा
जन्मा येवून जावे साई दर्शना
मी पण मनी म्हणे कोण मज नेईल बाबा पाशी ॥धृ॥
परी मनी ओढ असे साई दर्शनाची
दैवाचे ते पडती फासे सरळ
होई विवाह साई भक्तांशी
तया अंतरी ओढ साई बाबांची
मज म्हणती चल ग जावू साई दर्शनाशी ॥१॥
हृदय नाचे आनंदाने नाव घेता बाबांचे
बघता वंदन बाबांचे वाटे मनी
अहा धन्य झाले येवून शिरडीशी
बघता प्रेमळ मूर्ती समाधी बाबांची
हरे दैन्य दुःख चिंता मनाची
आनंदाने हृदय नाचे साई दर्शनाने ॥२॥
निघता परत पाऊली दुःख वाटे अंतरी
जशी सीता निघाली वनवाशी
जड अंतरी म्हणे पुनरुपी येते बाबा तव चरणापाशी

# जन हो बोला साई साई

जनहो बोला साई, साई
भवसागर हा तरुनी जाई ॥ धृ० ॥
नित्य घेता नाम साईचे
स्मरण न राहे संकटाचे
मुखी वदता साई, साई
क्षणात तो धावत येई
भक्ती हवी त्याच्या ठाई
त्वरीत तो आश्रय देई, जन हो बोला साई ॥ १ ॥

किती पवित्र ती दोन अक्षरे
जसे वदती 'आई' लेकुरे
तसेच वदती 'साई' भक्त आतुरे
जसे 'आई' तसेच 'साई'
त्यात नसे फरक काही
तेथे दुजा भाव नाही, जन हो बोला साई, ॥ २ ॥

असो राव अन् रंक
दोहोंची त्यास भाव-भुक
सर्वांचा तो असे दाता
जशी तान्ह्या बाळा माता
तोच असे जगाचा मायपिता
नमते ही शशी त्यास आता
हे सद्गुरु बाबा साई
तुज वाचुनी आश्रय नाही, जन हो बोला साई, ॥ ३ ॥

—सौ. शशिकला रेवणकर
बालाजी मंदिराजवळ,
कुंटोली, अंबरनाथ